
दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



• वर्ष : ०३ • अंक : २१७ • पुणे • रविवार, दि. १९ जुलै २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313


## ठळक बातम्या



### डॉ. कुमार सप्तर्षी यांचं निधन

पुणे (आरंभ पर्व) : ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, 'युवक क्रांती दला'चे (युक्रांद) संस्थापक आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन झाले, 85 व्या वर्षी त्यांनी अखरेचा श्वास घेतला. त्यांना मधुमेहाचा त्रास होता आणि अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना पुण्यातील एरंडवणे येथील खासगी रुग्णालयात नेले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पुरोगामी विचारवंत होते.



### ७२व्या राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा

मुंबई (आरंभ पर्व) : आदित्य धर यांच्या 'आर्टिकल 370' चित्रपटाला शनिवारी 72व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 2024 वर्षातील सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा पुरस्कार मिळाला. तर, 'श्रीकांत' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आणि यामी गौतमला प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला. त्याचबरोबर, 'ब्रमायुगम'साठी ममूटी आणि 'चंदू चॅम्पियन'साठी कार्तिक आर्यन यांना संयुक्तपणे प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला.

# वास्तुरचनाकारांनी सर्जनशील वृत्ती अंगीकारावी

**आर्कि. अजय सोनार यांचे प्रतिपादन; 'एसएमईएफ'तर्फे आयोजित 'ब्रिक १२ ऑन १२' प्रदर्शनातून वास्तुकलेतील नवकल्पनांना चालना**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी भावी वास्तुरचनाकारांनी नवतंत्रज्ञानाची सांगड सर्जनशीलता, संशोधन आणि प्रयोगशीलतेशी घालणे आवश्यक आहे. समाजाभिमुख, पर्यावरणपूरक आणि शाश्वत वास्तुरचना हीच काळाची गरज असून, विद्यार्थ्यांनी केवळ इमारतींची रचना न करता लोकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडविणारी दृष्टी विकसित करावी," असे प्रतिपादन प्रसिद्ध वास्तुविशारद तथा 'ए फॉर आर्किटेक्चर'चे सहसंस्थापक आर्कि. अजय सोनार यांनी केले.



सतीश मिसाळ एज्युकेशनल फाउंडेशनच्या ब्रिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे आयोजित 'ब्रिक १२ ऑन १२' या प्रदर्शनावेळी सोनार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उपक्रमाचे हे आठवे वर्ष होते. आघारकर रस्त्यावरील सारथी संस्थेच्या सभागृहात आयोजित या दोन दिवसीय उपक्रमात १२ निवडक विद्यार्थ्यांनी प्रत्येकी १२ मिनिटांत आपल्या वास्तुकलेशी संबंधित संशोधन, संकल्पना आणि डिझाइन सादर केले. यासोबतच वार्षिक प्रदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा मेळावा, तज्ज्ञांची व्याख्याने आणि परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध डिझाइन संकल्पना, संशोधन प्रकल्प आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचे प्रदर्शन उपस्थितांनी पाहिले. वास्तुकला क्षेत्रातील तज्ज्ञ, माजी विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत करिअरच्या संधी, आधुनिक तंत्रज्ञान आणि उद्योगातील बदलत्या अपेक्षांविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधनवृत्तीला आणि व्यावसायिक तयारीला चालना देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमावेळी प्रख्यात वास्तुरचनाकार आर्कि. राजीव विश्वासराव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे, संस्थेच्या संस्थापक संचालिका डॉ. पूजा मिसाळ, प्राचार्या डॉ. पूर्वा केसकर, उपप्राचार्या आर्कि. मनाली देशमुख, आर्कि. अभंग कांबळे, आर्कि. नलिनी निंबाळकर, आर्कि. मयुरेश शिरोळकर, डॉ. वैदेही लवांड, डॉ. श्रद्धा माहोरे-मांजरेकर, डॉ. सुधीर देशपांडे, आर्कि. अक्षय गांधी, आर्कि. इरावती नाथ यांच्यासह वास्तुरचना क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. आर्कि. राजीव विश्वासराव यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक जगातील अनुभव सांगत वास्तुकलेत तांत्रिक कौशल्याबरोबरच सामाजिक जबाबदारी, स्थानिक गरजांची जाण आणि सातत्याने शिकण्याची वृत्ती महत्त्वाची असल्याचे सांगितले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे यांनी संशोधनाधारित शिक्षण, नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि बहुआयामी विचारसरणी यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

# ठाकरेंच्या फुटलेल्या सहा खासदारांची खासदारकी वाचली



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ठाकरेंच्या शिवसेनेतून बंडखोरी करत शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिलेल्या सहा फुटीर खासदारांबाबत लोकसभा सचिवालयाने एक मोठा निर्णय घेतला आहे. या सहा फुटीर खासदारांच्या गटाच्या विलिनीकरणाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंचे सहा खासदार आता शिंदेंच्या शिवसेनेचे अधिकृत खासदार बनले आहेत. ठाकरेंच्या शिवसेनेचे ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील, संजय देशमुख, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, नागेश पाटील आष्टीकर या सहा खासदारांनी वेगळा गट स्थापन केला. नंतर या गटाने शिंदेंच्या शिवसेनेत विलिनीकरण केलं. आता या विलिनीकरणावर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शिक्कामोर्तब केलं आहे. त्यामुळे या सहाही खासदारांची खासदारकी वाचली असून ते आता शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार म्हणून काम करणार आहेत. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, "ज्या लोकांनी या खासदारांना निवडून दिलं आहे त्यांची कामं होणं महत्त्वाची आहेत. आमच्याकडे आलेल्या सहा खासदारांनी त्यांच्या मतदारसंघाच्या विकासासाठी हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांना मोठा विकासनिधी दिला जाईल." आधीच एकटा फुटीचा सामना करावा लागलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेला आणखी एक मोठा धक्का बसला.

# संस्कार प्रतिष्ठानच्यावतीने ७०० हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ त्यांच्या यशाचा गौरव नसून समाजाच्या उज्ज्वल भविष्यातील गुंतवणूक आहे, असा संदेश देणारा संस्कृती प्रतिष्ठानचा २४ वा 'गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ' रविवारी कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात उत्साहात पार पडला. दहावी आणि बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या ७०० हून अधिक विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



या वेळी झारखंडचे नागरी संरक्षण आयुक्त रमेश घोलप यांनी आपल्या संघर्षमय जीवनप्रवासातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. "यश हे केवळ गुणपत्रिकेत नसते, तर सातत्यपूर्ण प्रयत्न, जिद्द आणि व्यक्तिमत्त्व विकासात असते," असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, अभिनेते-दिग्दर्शक प्रवीण तरडे, अभिनेत्री स्नेहल तरडे, नगरसेवक नीलेश कोंढाळकर, दिनेश माथवड, वासंती जाधव, ज्योत्स्ना कुलकर्णी, अल्पना वरपे, महेश शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी गुणवत्तेसोबतच सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव जोपासावी, असे आवाहन उपस्थितांनी केले. यावेळी संस्कृती प्रतिष्ठानने स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या १०० विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारण्याची महत्त्वाकांक्षी घोषणा केली. ज्ञानदीप अकॅडमीच्या माध्यमातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन, अभ्यास साहित्य आणि आवश्यक पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातून अधिकाधिक युवकांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश करून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

समाजासाठी प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींचाही यावेळी गौरव करण्यात आला. धाडसाने इतरांचे प्राण वाचविणाऱ्या आशिष वाकचौरे तसेच अवघ्या सव्वादोन वर्षांच्या वयात हनुमान चालीसा मुखोद्गत असलेल्या चिमुकल्या ध्रुव पवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करताना शिक्षण, संस्कार आणि राष्ट्रसेवेची भावना जोपासणारी तरुण पिढी घडविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.




## थोडक्यात पण महत्वाचे



### आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी “शैक्षणिक किट” उपक्रम

जुन्नर (आरंभ पर्व) : गरजू विद्यार्थांना मदत आणि मराठी शाळा वाचवा उद्देशानं वेडावलेल्या मित्रांनी आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी "शैक्षणिक किट वाटप" उपक्रम राबविला. शैक्षणिक साहित्य व पुस्तकांअभावी अभ्यासात मागे पडू नये ह्या हेतूने सोशल मिडियातून उपक्रमाची माहिती प्रसारित केल्यानंतर कोल्हापूर येथील दीपाली दिघे व हैदराबाद येथील अमित साबळे यांनी दिलेल्या आर्थिक निधीतून "शैक्षणिक किट वाटप" संकल्पना राबवणारे पुणे येथील विशाल गोराणे यांनी शैक्षणिक साहित्य विकत घेवून सुनियोजितपणे हा उपक्रम राबविला. या अंतर्गत आदिवासी भागातील वसईवाडी , पेठेचीवाडी, राजूर नंबर दोन व शिवेची वाडी गावांतील जिल्हा परिषद शाळेतीळ विद्यार्थ्यांना दप्तरे व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तीन जिल्हा परिषद शाळेतील ७१ विद्यार्थ्यांना उपक्रमाचा लाभ झाला.

### बारामतीची श्रावणी राज्यात पहिली, NEET परीक्षेत घवघवीत यश



पुणे (आरंभ पर्व) : देशात एकीकडे नीट पेपरफुटीवरुन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी होत असताना दुसरीकडे री-नीट परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. त्यामध्ये, बारामतीची श्रावणी कुदळे नीट परीक्षेमध्ये देशात पाचवी तर मुलींमध्ये पहिली आली आहे. पहिल्याच प्रयत्नात श्रावणी कुदळेने हे घवघवीत यश संपादन केल्याने तिचे आई-वडील देखील आनंदी आहेत. कृष्णा कुदळे आणि जयश्री कुदळे हे तिचे आई-वडिल जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षक आहेत. मुलीने इतकं मोठं यश संपादन करेल असं वाटलं नव्हतं तिने यश संपादक केलं, त्याचं कौतुक होतय असे तिच्या पालकांनी म्हटले. तसेच, उपमुख्यमंत्री तथा बारामतीच्या आमदार सुनेत्रा पवार यांनीही फोनवरुन तिचे अभिनंदन केले. श्रावणीने पहिल्याच प्रयत्नात नीट परीक्षा पास केली आहे, फक्त परीक्षाच पास नाही केली तर श्रावणी देशात पाचवी तर मुलींमध्ये देशात पहिली आली आहे, विशेष म्हणजे ती राज्यात पहिली आली आहे. श्रावणीने 720 पैकी तिने 710 मार्क मिळवले आहेत. बायोलॉजी मध्ये 360 पैकी 360 मार्क, केमिस्ट्री मध्ये 180 पैकी 175 तर फीजिक्स 180 पैकी 175 मार्क मिळाले आहेत. श्रवणीने रोज कॉलेज वगळता रोज 6 तास अभ्यास केला आहे. तसेच अनेक आवडी निवडीला तिला आळा घालावा लागला. आठवीत असताना तिने डॉक्टर व्हायचे ठरवले होते. तसेच पहिली परीक्षा देताना पेपर लिक झाला त्याचा तिला अजिबात त्रास झाला नाही, असेही तिने सांगितले.

### दुर्मिळ ऑटोइम्यून मेंदूविकारावर तरुणीची यशस्वी मात

पुणे (आरंभ पर्व) : वैद्यकीय तज्ज्ञता आणि वेळेवर करण्यात आलेल्या उपचारांचे उत्तम उदाहरण ठरलेल्या एका प्रकरणात, २१ वर्षीय विद्यार्थिनी अनिता सुर्वे (नाव बदललेले) हिने दुर्मिळ आणि गंभीर न्यूरोलॉजिकल आजार ‘अँटी-एनएमडीए रिसेप्टर एन्सेफलायटिस’वर यशस्वी मात केली. सह्याद्रि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, हडपसर, मणिपाल हॉस्पिटल्सच्या नेटवर्क हॉस्पिटलमध्ये तब्बल ५५ दिवस चाललेल्या अतिदक्षता उपचारांनंतर ती पूर्णपणे बरी झाली. पूर्वी कोणताही गंभीर वैद्यकीय इतिहास नसलेल्या अनिताला २८ जानेवारी रोजी गोंधळलेली मानसिक अवस्था, स्मरणशक्ती कमी होणे, वर्तनातील बदल आणि संज्ञानात्मक कार्यात बिघाड अशी तीव्र न्यूरोलॉजिकल लक्षणे दिसू लागल्यानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची प्रकृती झपाट्याने खालावत गेली आणि सतत एन्सेफालोपॅथी तसेच जनरलाइज्ड टॉनिक-क्लॉनिक आणि फोकल फिट्ससारखे वारंवार झटके येऊ लागले. त्यामुळे तिला तातडीने ICU मध्ये दाखल करून सतत न्यूरोमॉनिटरिंग करण्यात आले.

### अंतिम सामन्याचा थरार अनुभवा आता एअरटेल वाय-फाय+ सोबत


मुंबई (आरंभ पर्व) : फिफा विश्वचषकाचा अंतिम सामना आता अगदी जवळ आला असून, देशभरातील देशभरातील फुटबॉल चाहते या मोठ्या सामन्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. याच पार्श्वभूमीवर एअरटेलने आपल्या वाय-फाय + टीव्ही (आयपीटीव्ही आणि डीटीएच) ग्राहकांना सामना पाहण्यासाठी एक सोपा आणि परवडणारा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. कंपनीच्या माहितीनुसार, पात्र ग्राहक त्यांच्या सध्याच्या प्लॅनमधूनच फीफा विश्वचषक अंतिम सामन्याचा आनंद घेऊ शकतात किंवा फक्त 24 रुपये प्रति महिना देऊन युनाईट8 स्पोर्ट्स चॅनेल सुरू करू शकतात आणि हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये थेट सामना पाहू शकतात. एअरटेलने ग्राहकांना आवाहन केले आहे की, वेगळे स्ट्रीमिंग किंवा टीव्ही सबस्क्रिप्शन घेण्यापूर्वी एअरटेल ॲपवर जाऊन आपल्या सध्याच्या वाय-फाय + टीव्ही प्लॅनमध्ये कोणते फायदे मिळतात, ते तपासून पाहावेत.

# मधुमेहींसाठी डोळ्यातील इंजेक्शनला पर्यायी उपचार

## अमेरिकेतील जागतिक नेत्रविज्ञान परिषदेत पुण्याच्या आयुर्वेदप्रेरित संशोधनाची दखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मधुमेहामुळे होणाऱ्या डायबेटिक रेटिनोपॅथीच्या उपचारासाठी वारंवार डोळ्यात इंजेक्शन घेण्याची गरज कमी करू शकणाऱ्या आयुर्वेदप्रेरित उपचारपद्धती विकसित करण्यात आली आहे. या उपचारपद्धतीवरील संशोधनाची दखल अमेरिकेतील जगातील सर्वात मोठ्या नेत्रविज्ञान परिषदेत घेण्यात आली आहे. पुण्यातील रसायनी बायोलॉजिक्स यांनी विकसित केलेल्या 'तिमिरेक्स-आर' या नॅनोतंत्रज्ञानाधारित तोंडावाटे घेण्याच्या उपचारपद्धतीवरील संशोधनाची असोसिएशन फॉर रिसर्च इन व्हिजन अँड ऑप्थॅल्मोलॉजी



(एआरव्हीओ) २०२६, या प्रतिष्ठेच्या परिषदेसाठी निवड झाली. अमेरिकेतील डेन्व्हर येथे झालेल्या या परिषदेत जगभरातील सुमारे ११ हजार नेत्रतज्ज्ञ सहभागी झाले होते. भारताच्या पारंपरिक वैद्यकशास्त्राचे प्रतिनिधित्व करत या परिषदेत संशोधन सादर करणारे डॉ. योगेश बेंडाळे हे एकमेव संशोधक ठरले. हे संशोधन रसायु आयुर्वेद क्लिनिकमध्ये करण्यात आले असून, संशोधन पथकात डॉ. अविनाश कदम, डॉ. केतकी जगताप आणि डॉ. प्राजक्ता पोटे यांचा सहभाग होता. मधुमेहामुळे होणारा डायबेटिक रेटिनोपॅथी हा टाळता येण्याजोग्या अंधत्वामागील प्रमुख कारणांपैकी एक मानला जातो. भारतात १० कोटींहून अधिक नागरिक मधुमेहाने ग्रस्त असून, त्यातील अनेकांना पुढे डोळ्यांच्या गंभीर गुंतागुंतींचा सामना करावा लागतो. अशा रुग्णांना दृष्टी टिकवण्यासाठी वारंवार डोळ्यात इंजेक्शन घ्यावे लागते. मात्र या उपचारामुळे रुग्णांना वेदना, मानसिक ताण, वेळ आणि खर्चाचा मोठा भार सहन करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या अभ्यासात पूर्वी अनेक वेळा डोळ्यात इंजेक्शन घेऊनही अपेक्षित सुधारणा न झालेल्या रुग्णांचा समावेश करण्यात आला होता. ऑप्टिकल कोहेरन्स टोमोग्राफी (ओसीटी) तपासणीत उपचारानंतर रेटिनावरील सूज कमी झाल्याचे आणि डोळ्यांच्या रचनेत अनुकूल बदल झाल्याचे संशोधकांनी नमूद केले आहे.

संशोधनानुसार, निरीक्षण कालावधीत अशा सुमारे ९० टक्के रुग्णांना पुन्हा डोळ्यात इंजेक्शन घेण्याची गरज भासली नाही. तसेच उपचारादरम्यान कोणतेही गंभीर दुष्परिणाम आढळले नसल्याचा दावा संशोधनात करण्यात आला आहे. 'तिमिरेक्स-आर' या उपचारपद्धतीला अमेरिका तसेच इतर देशांमध्ये आंतरराष्ट्रीय पेटंट संरक्षणही मिळाले आहे. याबाबत डॉ. योगेश बेंडाळे म्हणाले, "आयुर्वेद हे केवळ परंपरागत ज्ञान नसून आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध होऊ शकणारी उपचारव्यवस्था आहे. भारतात विकसित झालेले हे संशोधन भविष्यात मधुमेहामुळे दृष्टी गमावण्याच्या धोक्याशी सामना करणाऱ्या लाखो रुग्णांसाठी आशादायी ठरू शकते.

नेत्रविज्ञान क्षेत्रातील सर्वोच्च वैज्ञानिक व्यासपीठ मानल्या जाणाऱ्या 'एआरव्हीओ' परिषदेत पुण्यातील या संशोधनाची झालेली निवड ही भारतीय आयुर्वेद, आधुनिक विज्ञान आणि स्वदेशी संशोधन क्षमतेला मिळालेली महत्त्वाची आंतरराष्ट्रीय मान्यता आहे."

## झिथारा.एआयची पाल्मोनाससोबत धोरणात्मक भागीदारी

**हैदराबाद (दै. आरंभ पर्व)**

ऑफलाइन किरकोळ व्यवसायांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ग्राहक संवाद आणि व्यवस्थापन सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या झिथारा.एआयने ज्वेलरी क्षेत्रातील पाल्मोनाससोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. या भागीदारीच्या माध्यमातून ग्राहकांना अधिक वैयक्तिक आणि प्रभावी खरेदी अनुभव देण्याबरोबरच ग्राहकांशी दीर्घकालीन संबंध निर्माण करणे आणि व्यवसायाच्या महसुलात वाढ करणे हा प्रमुख उद्देश आहे. या भागीदारीअंतर्गत पाल्मोनासकडून झिथारा.एआयच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ग्राहक संबंध व्यवस्थापन प्रणालीचा वापर केला जाणार आहे. विविध माध्यमांतून उपलब्ध होणारी ग्राहकांची माहिती एकत्रित करून त्यांच्या संवादाचा एकाच ठिकाणी आढावा घेणे या प्रणालीमुळे शक्य होणार आहे. तसेच ग्राहकांचे वर्गीकरण, स्वयंचलित संपर्क आणि त्यांच्या आवडी व गरजांनुसार वैयक्तिक संदेश पाठवण्याची सुविधाही उपलब्ध होणार आहे.

## जुन्नरच्या दुर्गम भागातील सहा शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शुक्रवार, दि. १८ रोजी जुन्नर तालुक्यातील दुर्गम भागातील सहा जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यासाठी ठाणे येथील उपक्रमासाठी हरि ओम मित्र मंडळानेआवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले. यावेळी कार्यक्रमात संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा सुषमा धादवड, सचिव संदीप कोल्हाळ, काळूराम मुकणे, सुरेश जोशी, किरण म्हस्कर, हनुमंत काठे, विनायक धादवड, नितीन खिल्लारी यांच्यासह संबंधित शाळांतील शाळा



व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सरपंच, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी,पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हरि ओम मित्र मंडळ, ठाणेचे अध्यक्ष सुनील भोळे तसेच अभिजीत दीक्षित यांनी व्हिडिओ कॉलद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच मन लावून अभ्यास करून उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. शैक्षणिक साहित्याचे वितरण होताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह सर्व उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने हरि ओम मित्र मंडळाचे पदाधिकारी, दाते आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. भविष्यातही अशाच प्रकारचे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## भक्तीमय वातावरणात नवले प्राथमिक शाळेमध्ये पालखी सोहळा

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळा (मनपा शाळा 56 बी ) मध्ये आज (शनिवार) आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेला पालखी सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या पालखी सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन वैभव फटांगरे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली. त्यानंतर





विनया पायगुडे यांनी "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" तसेच "ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम" या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

पालखीसह ढोल-ताशे, टाळ-मृदुंगाच्या गजरात तुळशी वृंदावन, विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती घेऊन विद्यार्थ्यांनी गोल रिंगण साकारले. वारकरी परंपरेनुसार अभंग गायन करण्यात आले. त्यानंतर प्रभात फेरी काढत पालखी धायरी फाटा येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात नेण्यात आली.

मंदिर परिसरात वैभव फटांगरे यांनी विद्यार्थ्यांना पालखी परंपरेचे महत्त्व समजावून सांगितले. यादव साबळे यांनी आपल्या सुमधुर आवाजात अभंग सादर करून वातावरण अधिक भक्तिमय केले. यावेळी प्रभारी मुख्याध्यापिका सुमन गंथडे यांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार आणि भक्तीचे महत्त्व यांची माहिती दिली. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, गणेश पतंगे, अनिता शितोळे आणि रेश्मा नवले उपस्थित होत्या. पालखी शाळेत परतल्यानंतर विद्यार्थ्यांनी फुगडी खेळत आनंदोत्सव साजरा केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक संध्या चांदगुडे, संगीता जागडे, वैजनाथ दराडे, उर्मिला दराडे आणि आशा नवगिरे यांनी विद्यार्थ्यांची विशेष काळजी घेत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. संपूर्ण सोहळ्यात भक्ती, संस्कार आणि वारकरी परंपरेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

## तळमाचीवाडी : अतिवृष्टीमुळे जमिनीस भेगा; भूस्खलनाची भीती

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

आदिवासी भागातील तळमाचीवाडी ता.जुन्नर येथे रविवारी ता.१२ जुलै पासून अतिवृष्टीमुळे पुन्हा एकदा जमिनीस भेगा पडण्यास सुरवात झाली आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दौडया डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या वाडीच्या वरील बाजूला २००५ पासून जमिनीत भेगा पडत असल्याने भूस्खलन होण्याची भीती व्यक्त होत आहे. यावर्षी रविवारी दि. १२ रोजी गावकऱ्यांना पुन्हा भेगा पडल्याचे आढळून आले. त्याचे फोटो सर्कल व तलाठी यांना पाठविण्यात आले त्यानुसार त्यांनी सोमवारी प्रत्यक्ष येऊन पाहणी केली. त्यांनी आपला अहवाल तहसीलदारांना पाठविला



असल्याचे सांगितले. आज शनिवार ता.१८ रोजी फक्त सहा ग्रामस्थांना तहसीलदार यांनी आपण सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे अशी नोटीस दिली आहे. या व्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तळमाचीवाडीच्या वरील बाजूस असलेल्या पलाडवाडी पासून काही मीटर अंतरापासून ही भेग पडलेली आहे. सदर भेग सुमारे ७०० ते ८०० मीटर लांबीची आहे.

## पिरामल फायनान्सचा आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीतील नफा ६७% वाढून ४६१ कोटी रुपयांवर पोहोचला

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पिरामल फायनान्स लिमिटेडने 30 जून 2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीत चांगली कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचा एकत्रित निव्वळ नफा मागील वर्षाच्या तुलनेत 67 टक्क्यांनी वाढून 461 कोटी झाला आहे. मालमत्ता व्यवस्थापनातील वाढ (एयूएम), एआय तंत्रज्ञानाचा वापर, रिटेल कर्ज वितरणात झालेली वाढ आणि कर्जाच्या गुणवत्तेतील स्थिरता यामुळे ही वाढ झाली आहे. कंपनीच्या रिटेल कर्ज वितरणात मागील वर्षाच्या तुलनेत 44 टक्क्यांनी वाढ झाली असून ते 12,527 कोटीं रुपयांवर पोहोचले आहे. यावरून ग्राहकांकडून कर्जाची वाढती मागणी आणि व्यवसायातील सातत्यपूर्ण वाढ दिसून येते. कंपनीची एकूण व्यवस्थापनाखालील मालमत्ता (एयूएम) 25 टक्क्यांनी वाढून 1.07 लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. तर रिटेल एयूएम मध्ये 32 टक्क्यांची वाढ होऊन ती 91,249 कोटीं रुपये झाली आहे. याशिवाय, कंपनीच्या संचालक मंडळाने भागधारकांच्या मंजुरीच्या अधीन राहून 4,000 कोटीं रुपयांपर्यंत निधी उभारण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मजबूत कामगिरीबद्दल बोलताना पिरामल फायनान्स लिमिटेडचे अध्यक्ष आनंद पिरामल म्हणाले, "पिरामल फायनान्स ही भारताच्या उच्चस्तरीय एनबीएफसी कंपन्यांमधील सर्वात नवीन कंपनी असली तरी, आम्ही देशभरातील जवळपास 60 लाख ग्राहकांना सेवा देणारे विविध प्रकारचे रिटेल फायनान्स नेटवर्क उभे केले आहे. आमच्या प्रत्यक्ष शाखांच्या मोठ्या नेटवर्कसोबतच प्रत्येक कामकाजात तंत्रज्ञान आणि एआयचा वापर करून आम्ही ग्राहकांना अधिक चांगल्या सेवा देण्यास सक्षम झालो आहोत. मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत कंपनीने 276 कोटीं रुपयांचा एकत्रित निव्वळ नफा नोंदवला होता. कंपनीने देशभरातील आपले नेटवर्क वाढवत 26 राज्यांमधील 607 शहरांमध्ये 780 शाखा सुरू केल्या आहेत. तसेच, कंपनीच्या ग्राहक संख्येत मागील वर्षाच्या तुलनेत 24 टक्क्यांची वाढ होऊन ती 60 लाखांवर पोहोचली आहे. यामुळे भारतातील कंपनीची उपस्थिती आणखी मजबूत झाली आहे. कंपनीने सांगितले की, गोल्ड लोन व्यवसायावर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीमध्ये पिरामल फायनान्सने 6 कोटीं रुपयांचे गोल्ड लोन वितरित केले आहे.

# मुरबाड ते शिवनेरी-जुन्नर पर्यंत रेल्वेमार्ग व्हावा : माळशेज रेल्वे कृती समितीची मागणी

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड पर्यत मंजूर झालेला रेल्वेमार्ग शिवनेरी-जुन्नर पर्यंत व्हावा.यासाठी तसेच कल्याण अहिल्यानगर रेल्वेसाठी संघर्ष उभारण्यात येईल अशी माहिती माळशेज रेल्वे कृती समितीचे उपाध्यक्ष कृषीभूषण मुरलीधर गुंजाळ यांनी दिली.

ऐतिहासिक वारसा लाभलेले विद्येचे माहेरघर पुणे व धार्मिक ऐतिहासिक परंपरांनी पावन क्षेत्र नाशिक या दोन्ही शहरांना जोडणारा पुणे-नाशिक रेल्वेमार्ग अर्थात पुणे, हडपसर, चाकण, अहिल्यानगर, राहुरी, शिर्डी आणि नाशिक असा प्रस्तावित आहे.वेळ आणि गती: गाड्या ताशी १६०



ते २०० किमी वेगाने धावतील, ज्यामुळे २३५ किमीचे अंतर सुमारे २ तासांत पार करणे शक्य होईल हा रेल्वेमार्ग मंजूर केल्याबद्दल केंद्र सरकार,रेल्वेमंत्री व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करत आहोत. आता प्रास्तावित मुंबई लातूर एक्स्प्रेसवे जनकल्याण महामार्गाच्या समांतरकल्याण-मुरबाड-माळशेज(दाऱ्याघाट) शिवनेरी-वासुंदे मार्गे अहिल्यानगर रेल्वेमार्गाला मंजूरी देऊन ट्रँगल पूर्ण करावा. अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग गतीमान व्हावा.ज्यामुळे हा रेल्वेमार्ग बीड-परळीसह मराठवाड्याच्या विकासाचा राजमार्ग ठरेल.हा रेल्वेमार्ग झाला तर देशाची पश्चिम-पूर्व किणारपट्टी मुंबई-विशाखापट्टनम जोडणारा देशातला सर्वात मोठा रेल्वे प्रकल्प साकारला जाईल. तसेच कोंकण,प.महाराष्ट्र, मराठवाड्याला नजिकच्या मार्गाने मुंबईशी जोडणारा हा रेल्वेमार्ग साकारेल.या रेल्वेमार्गामुळे देशाच्या वैभवात भर पडेल. बीड,परळी,अहिल्यानगर,जुन्नर,मुरबाडच् या शेतकऱ्याला उत्पन्नाचे जोडमार्ग प्राप्त होतील.अकोले- संगमनेरच्या दक्षिण डोंगराळ भागाचा कायापालट होईल. माळशेज-शिवनेरी- लेण्याद्री,भिमाशंकर या परिसरात पर्यटन उद्योग वाढेल व त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.शेतकऱ्याला जोडव्यावसायाच्या संधी प्राप्त होतील.पर्यटन उद्योगाला वाव मिळेल,साखर,भाजीपाला, फळे आदी कृषी उत्पादने मुंबई मार्गे देश विदेशात निर्यात करता येतील. त्यातून शेतकऱ्याच्या उत्पन्नात भर पडेल. विदेशी लक्ष्मी समृद्धीच्या मार्गांनी बळीराजाचे दार ठोठावेल. मुंबई-ठाणेची श्रीमंती, पुण्याची विद्वत्ता व अहिल्यानगरचा सहकार या त्रिवेणी संगमातून महाराष्ट्राचे भाग्य रेखाटले जाईल. स्वातंत्र्यसेनानी स्व.गोविंदभाई श्रॉफ,स्व.खासदार केशरकाकू क्षीरसागर,पत्रकार सुधाकर डोईफोडे, स्व.माजी आमदार श्रीकृष्णराव तांबे, स्व.माजी खासदार निवृत्तीशेठ शेरकर,स्व. प्रकाश परांजपे,स्व.शांतारामबापू घोलप,स्व.प्रो.रामभाऊ कापसे,स्व. गोपीनाथ मुंढे,स्व.बाळासाहेब विखेपाटील, स्व.दिलीप गांधी,गुलाबराव शेळके अशा अनेक दिग्गज नेत्यांनी मागणी केलेल्या या रेल्वेप्रकल्पाच्या मंजूरीसाठी १९९६ पासून माळशेज रेल्वे कृति समितीच्या माध्यमातून पाठपुरावा केला जात आहे. हा रेल्वेमार्ग व्हावा म्हणून निर्धार मेळावे, रेल्वे परिषदा,जनजागरण यात्रा, रेल्वेरथयात्रा, ५ लाख सहयांची मोहिम,दिल्ली यात्रा असे सर्व सोपस्कार माळशेज रेल्वे कृति समितीने पार पाडले. त्यामुळे २००६ मध्ये सर्वेक्षण झाले. तर २०१९ पासून मुरबाड पर्यंत पहिला टप्प्या मंजूर झाला. (हा पहिला टप्पा मढ-शिवनेरी पर्यत होणं हे व्यावहारिकदृष्ट्याही सोयीचे आहे.त्यातून मुरबाड, शिवनेरीपर्यंत मुंबई विकसीत होईल.) या रेल्वेमार्गासाठी शरद पवार व अण्णा हजारे यांचे आशिर्वाद लाभले.खासदार सुप्रिया सुळे,शिवाजीराव आढळराव पाटील,खासदार भाऊसाहेब वाकचौरे,बाळासाहेब थोरात, शिवाजीराव नलावडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी माळशेज रेल्वे कृति समितीला कायम सक्रिय साथ दिली.महाराष्ट्राच्या सर्वांगिन हितासाठी कल्याण-अहिल्यानगर अर्थात Third Ghat Relwe Project मंजूरीसाठी भविष्यात बीड,परळी पासून सर्वपक्षीय कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन तरुणांचा संघटीत संघर्ष उभारण्याचा असा निर्धार माळशेज रेल्वे कृति समितीचे अध्यक्ष दिनेशचंद्र हुलवळे, उपाध्यक्ष मुरलीधर गुंजाळ,दादा भालेकर, मिलिंदराव गंधे,जि.प.सदस्य गुलाब पारखे, वैभव काळे,राजूभाऊ घुगे,सतिष बांगर यांनी व्यक्त केला आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. १९ जुलै २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### लिखाणाचा गौरव : मिलिंद कदम यांना अजेय लेखणी पुरस्कार प्रदान

चिपळूण (आरंभ पर्व) : आर्यारवी एंटरटेनमेंट'च्या वतीने येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मिलिंद कदम यांना अजेय लेखणी पुरस्काराने गौरविण्यात आले रविवारी (दि. १२ जुलै २०२६) दादर मुंबई येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर सभागृहात कदम यांना ज्येष्ठ साहित्यिक कवी प्रा. विसुभाऊ बापट, साहित्यिक अरुण म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर तोडणकर, आर्यारवी एंटरटेनमेंटचे सर्वेसर्वा महेश्वर तेटांबे, यांच्याहस्ते सन्मानपूर्वक हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. समाजहित व जागृतीचे ध्यास उराशी बाळगून परखड लिखाण करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचे लिखाण समाजासाठी दिशादर्शक आहे, अशी भावना यावेळी आयोजकांकडून व्यक्त करण्यात आली.

### अतिवेगवान गती : सॅमसंगची नवीन ९९० एसएसडी भारतात

पुणे (आरंभ पर्व) : संगणकाची कार्यक्षमता वाढवू इच्छिणाऱ्या गेमर्स, कंटेंट निर्माते आणि उच्च क्षमतेच्या स्टोरेजची गरज असलेल्या वापरकर्त्यांसाठी सॅमसंग इंडियाने नवीन सॅमसंग ९९० एसएसडी भारतात सादर केली आहे. ही नवीन स्टोरेज ड्राइव्ह १ टेराबाइट आणि २ टेराबाइट या दोन क्षमतांमध्ये उपलब्ध होणार असून अतिवेगवान माहिती वाचन-लेखन, कमी वीज वापर आणि विश्वासार्ह कामगिरी ही तिची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. नवीन ९९० एसएसडीमध्ये आधुनिक पीसीआय एक्सप्रेस ४.० तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक नँड मेमरीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे मोठ्या आकाराच्या फाईल्सचे हस्तांतरण, उच्च दर्जाचे व्हिडीओ संपादन, प्रगत खेळांचा अनुभव आणि दैनंदिन संगणकीय कामे अधिक जलद आणि सुरळीत होतात. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सच्या मेमरी ब्रँड उत्पादन विभागाचे उपाध्यक्ष टॉमी (ह्योंगसुक) क्वोन यांनी सांगितले की, वाढत्या स्टोरेज गरजा, जड कामाचा ताण, उच्च दर्जाचे खेळ आणि स्वतःचा संगणक तयार करणाऱ्या वापरकर्त्यांसाठी सॅमसंग ९९० एसएसडी हा अत्यंत उपयुक्त पर्याय ठरेल.

### कॅलिफोर्निया बदाम : कुटुंबाची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : पावसाळा सुरू झाला आहे आणि त्यासोबतच हंगामी आजार, सर्दी, ताप आणि खोकल्याचे नेहमीचे प्रमाणही वाढते, ज्यामुळे संपूर्ण कुटुंबाच्या रोगप्रतिकारक शक्तीची कसोटी लागते. ऋतूतील बदलांचा परिणाम लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत घरातील प्रत्येकावर होऊ शकतो, त्यामुळे पूर्वतयारी ठेवणे अधिक महत्त्वाचे ठरते. यासाठी संतुलित आहार हा सर्वात सोपा मार्ग आहे. कॅलिफोर्निया बदाम, संपूर्ण धान्ये तसेच वनस्पती आणि प्राणिज प्रथिनांसारखे रोगप्रतिकारक शक्तीला पूरक सुपरफूड्स आणि सक्रिय जीवनशैली यांची जोड संपूर्ण पावसाळ्यात मजबूत रोगप्रतिकारक शक्ती निर्माण करण्यास मदत करते.कॅलिफोर्निया बदाम हे असेच एक सुपरफूड आहे, जे नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध असून त्यामध्ये झिंक, तांबे आणि लोह यांसह 24 पोषक घटक असतात. हे पोषक घटक रोगप्रतिकारक शक्तीच्या कार्याशी संबंधित आहेत. पावसाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती अधिक महत्त्वाची ठरत असल्याने, तज्ज्ञ आणि अभिनेत्री सोहा अली खान यांनी पोषक घटकांनी समृद्ध साधे अन्नपदार्थ या ऋतूमध्ये एकूण आरोग्याला कसा आधार देऊ शकतात, याविषयी माहिती दिली आहे. पावसाळ्यात निरोगी राहण्यासाठी काय करावे, याविषयी भाष्य करताना न्यूट्रिशन आणि वेलनेस कन्सल्टंट शीला कृष्णस्वामी म्हणाल्या, "पावसाळा हा असा ऋतू आहे, जेव्हा आपल्या शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीची सर्वाधिक परीक्षा होते. आहारातील छोट्या आणि सातत्यपूर्ण सवयी तुमची रोगप्रतिकारक शक्ती किती सक्षम राहते, यामध्ये मोठा फरक घडवू शकतात. दररोजच्या आहारात बदामांचा समावेश करणे ही अशीच एक सोपी सवय आहे. बदामांमध्ये जीवनसत्त्व ई आणि अनेक पॉलीफेनॉल्ससह 24 पोषक घटक असतात. हे दोन्ही अँटिऑक्सिडंट्स म्हणून कार्य करतात आणि रोगप्रतिकारक शक्तीला आधार देतात."

### ६,५०० एमएएच बॅटरी, ४४ वॅट जलद चार्जिंग आणि लष्करी दर्जाची मजबुती




नवी दिल्ली (आरंभ पर्व) : स्मार्टफोन क्षेत्रातील आघाडीची कंपनी विवो इंडियाने आपल्या टी मालिकेतील नवीन विवो टी५ लाइट ४४ वॅट ५जी हा स्मार्टफोन भारतीय बाजारात सादर केला आहे. दमदार ६,५०० एमएएच बॅटरी, ४४ वॅट जलद चार्जिंग, लष्करी दर्जाची टिकाऊ रचना, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुविधा आणि आकर्षक रचना या वैशिष्ट्यांमुळे हा स्मार्टफोन तरुण ग्राहकांसाठी उपयुक्त पर्याय ठरणार असल्याचा कंपनीचा दावा आहे.

### जाहीर नोटीस

अहमदनगर येथील मे. उपविभागीय अधिकारी, नगर भाग अहमदनगर यांचे कोर्टात आरटीएस अपील नं. १८/२०२६

रेस्पॉंडंट नं. ३. सहादु नाना बेरड (मयत वारस) ३ ब. सुनिता लक्ष्मण वाळके, रा. जगतगुरू सोसायटी, अनु.क्र. ८८/१/७, प्लॉट नं. १२, लोहगाव पुणे, ३ क. कमल सहादु बेरड, रा. शहापुर, पो.निंबोडी, ता.जि. अहिल्यानगर यांना या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे शहापुर, ता. अहिल्यानगर येथील गट नं. ६० चे संदर्भात मंडळाधिकारी चिचोंडी पाटील, ता. अहिल्यानगर यांनी तक्रार केस नं. २३/२०२५ मध्ये फेरफार क्र. १९४४ बाबत दिनांक १२/११/२०२५ रोजी पारीत केलेले आदेशावर नाराज होऊन अपेलंट यांनी सदरचे अपील दाखल केलेले आहे.

प्रस्तुत अपीलाचे सुनावणीकामी तुमचे पत्त्यावर वारंवार नोटीस पाठवुनही देखील बजावणी होत नसलेने तुमचे विरुध्द मे. कोर्टाने जाहिर नोटीसीचा आदेश केलेला आहे.

प्रस्तुतचे अपीलामध्ये सुनावणी दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वा. "उपविभागीय अधिकारी, नगर भाग अहमदनगर" यांचे दालनात नेमण्यात आली आहे.

सबब तुम्ही किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनीधींनी तुमचा कोणताही पुरावा असल्यास त्यासह सदरहू तारखेस ठिकाणी व वेळी माझेसमोर उपस्थित रहावे. वर निर्दीष्ठ केलेल्या वेळी व ठिकाणी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या किंवा कायदेशीर प्रतिनीधींच्या अनुपस्थितीत अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सदरील जाहिर नोटीस माझे सही व शिक्यानिशी आज दिनांक ०७/०७/२०२५ रोजी दिली असे.

सही/-
(सुधीर पाटील)
उपविभागीय अधिकारी,
अहिल्यानगर भाग अहिल्यानगर

उपविभागीय अधिकारी,
नगर भाग अहमदनगर
आरटीएस अपील नं. १८/२०२६

# मातीचा गंध जपणारा दिग्दर्शक

## मा. प्रवीण विठ्ठल तरडे : आशेचा दिवा पेटवणारा कलावंत

- सिनेमांच्या माध्यमातून प्रबोधन

**शब्दांकन : मा. श्री. लक्ष्मण साबळे**
**(निवासी संपादक)**





**(दै. आरंभ पर्व)**

चित्रपट हा केवळ मनोरंजनाचा विषय नाही. तो समाजाचा आरसा असतो. तो माणसाला रडवतो, हसवतो, विचार करायला भाग पाडतो आणि अनेकदा जगण्याची नवी दिशा देऊन जातो. असे चित्रपट क्वचितच निर्माण होतात आणि असे चित्रपट घडवणारे दिग्दर्शकही फार कमी असतात. **प्रवीण विठ्ठल तरडे हे त्यापैकीच एक नाव.**

मुळशीच्या मातीत जन्मलेला हा कलावंत आजही त्या मातीशी प्रामाणिक आहे. त्याच्या चित्रपटांत ग्लॅमरपेक्षा गाव दिसतं, दिखाव्यापेक्षा वास्तव दिसतं, आणि कृत्रिमतेपेक्षा माणुसकीचा सुगंध जाणवतो. म्हणूनच त्यांच्या प्रत्येक चित्रपटात महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, ग्रामीण संस्कृती आणि सर्वसामान्य माणसाचं आयुष्य जिवंतपणे उभं राहतं.

मुळशी पॅटर्नने ग्रामीण वास्तवाचा एक वेगळा चेहरा दाखवला. त्यानंतर देऊळ बंद २मधून श्रद्धा, समाज, शेतकऱ्यांचं दुःख, संघर्ष आणि जगण्याची उमेद यांचा वेध घेण्याचा प्रयत्न झाला आहे. हा चित्रपट केवळ कथा सांगत नाही; तो मनात अनेक प्रश्न निर्माण करतो आणि माणसाला स्वतःकडे पाहायला भाग पाडतो.

प्रवीण तरडे यांच्या संवादांची ताकद ही त्यांची खरी ओळख आहे. हे संवाद एखाद्या वातानुकूलित कार्यालयात बसून लिहिलेले वाटत नाहीत. ते गावच्या पारावर जन्म घेतात, शेतातल्या बांधावर आकार घेतात, चहाच्या टपरीवर घडतात आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रूंमधून शब्द बनतात. म्हणूनच त्यांचे संवाद थेट हृदयाला स्पर्श करतात.

कलावंताची खरी ओळख त्याच्या सामाजिक बांधिलकीत असते. देऊळ बंद २ला यश मिळाल्यानंतर त्यातून मिळणाऱ्या नफ्याचा काही भाग शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी देण्याचा त्यांनी व्यक्त केलेला संकल्प अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. जर कला समाजासाठी उभी राहत असेल, तर त्यापेक्षा मोठं यश कोणतं?

आज महाराष्ट्रात अनेक शेतकरी आर्थिक संकट, नैराश्य आणि आत्महत्यांच्या दुष्टचक्राशी झुंज देत आहेत. अशा वेळी सिनेमा जर त्यांना जगण्याची आशा, संघर्षाची ताकद आणि नव्या विचारांची दिशा देत असेल, तर तो फक्त चित्रपट राहत नाही; तो समाजपरिवर्तनाचं माध्यम बनतो. कदाचित एखादा संवाद, एखादा प्रसंग किंवा एखादी आशेची ठिणगी एखाद्या निराश मनाला नव्याने जगण्याची उमेद देऊ शकते.

या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांनी साकारलेली स्वामींची भूमिका आणि स्नेहल तरडे यांनी साकारलेली संगीची व्यक्तिरेखा कथेला भावनिक खोली देतात. त्यांच्या अभिनयामुळे कथानकातील वेदना, श्रद्धा आणि माणुसकी अधिक प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचते.


आजच्या काळात शेकडो कोटींची कमाई करणारे चित्रपट अनेक असतील; पण समाजाच्या मनात विचारांची श्रीमंती निर्माण करणारे चित्रपट फार थोडे असतात. बॉक्स ऑफिसचे आकडे विसरले जातात, पण माणसाच्या मनात आशा निर्माण करणारी कला कायम स्मरणात राहते.

प्रवीण तरडे हे केवळ अभिनेता, लेखक किंवा दिग्दर्शक नाहीत. ते मातीतून घडलेले, मातीशी नाळ जपणारे आणि मातीतल्या माणसासाठी आपल्या कलेचा उपयोग करणारे संवेदनशील कलावंत आहेत.

अशा कलावंतांना पुरस्कारांनी नव्हे, तर समाजाच्या प्रेमाने आणि विश्वासाने मोठं केलं जातं.

**कारण शेवटी मातीशी प्रामाणिक राहणारी माणसंच इतिहास घडवतात... आणि समाज त्यांच्या कार्याला मनापासून सलाम करतो.**



### देवेंद्र फडणवीस कायम पाठीशी उभे राहणारे नेतृत्व : रविंद्र चव्हाण



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व हे राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविणारे आहे. गावागावातील शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे ते एकमेव नेतृत्व असून, त्यामुळे राज्यातील शेतकरी वर्ग पूर्ण ताकदीने देवाभाऊ सरकारच्या पाठीशी उभा आहे," असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. राज्यातील शेतकऱ्यांसाठी पीक कर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल भारतीय जनता पक्षाच्या किसान मोर्चाच्या वतीने मुंबई येथील यशवंतराव चव्हाण केंद्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात रविंद्र चव्हाण बोलत होते. यावेळी त्यांनी राज्य सरकारने शेती क्षेत्रासाठी राबविलेल्या विविध योजना आणि निर्णयांचा आढावा घेतला. शेतरस्ते व पाणंद रस्त्यांची उभारणी, जलयुक्त शिवार अभियान, शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर, कृषी पंपांना दिवसा मोफत वीज अशा विविध उपक्रमांमुळे राज्यातील शेती अधिक सक्षम होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या निर्णयांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडून येत असून, सरकारचे धोरण शेतकरी केंद्रित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आमदार संजय कुटे यांनी राज्यातील शेतकरी बांधवांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला.

### पुणे शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर तातडीने नियंत्रण आणावे

#### राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची पोलीस महासंचालकांकडे मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून, शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पुणे शहराच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. शहरातील गुन्हेगारीवर तातडीने प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी कठोर व ठोस उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पुणे शहरात खून, खंडणी, कोयता गँगचा वाढता धुमाकूळ, टोळी युद्ध, अंमली पदार्थांची विक्री, मानवी तस्करी, महिलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे तसेच वाढती वाहतूक कोंडी यांसारख्या गंभीर समस्यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. कोयता गँग आणि टोळी युद्धाच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

तसेच महिलांविरुद्ध होणारे गुन्हे, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार, विनयभंग तसेच सोशल मीडियाद्वारे होणारे सायबर गुन्हे रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली. शहरात वाढत असलेल्या ड्रग्जच्या अवैध विक्रीसह रेव्ह पार्टींवर कठोर कारवाई करून संबंधितांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पुणे शहरातील पोलीस दलाची मनुष्यबळ क्षमता वाढविणे, संवेदनशील भागांमध्ये पोलिसांचा बंदोबस्त मजबूत करणे, नियमित गस्त वाढविणे, गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे आणि नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.

पुण्यासारख्या वेगाने विस्तारत असलेल्या महानगरात नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शासन व पोलीस प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने या निवेदनाद्वारे व्यक्त केली.

खासदार शरदचंद्रजी पवार साहेब आणि खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या सूचनेनुसार पुणे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, माजी महापौर अंकुश काकडे, महापालिका गटनेते काकासाहेब चव्हाण, विशाल तांबे, मनाली भिलारे, प्रवीण तुपे, किशोर कांबळे, अतुल धावडे या शिष्टमंडळाने भेट घेतली यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## एचडीएफसी बँक परिवर्तनने केली १.६ लाख लोकांच्या जीवनात सुधारणा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

HDFC BANK
We understand your world

जागतिक युवा कौशल्य दिनाच्या निमित्ताने एचडीएफसी बँक परिवर्तन या एचडीएफसी बँकेच्या सीएसआर उपक्रमाअंतर्गत युवकांची कौशल्ये, ज्ञान आणि संधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रयत्नांना अधोरेखित करण्यात येत असून भारताच्या सध्याच्या बदलत्या अर्थव्यवस्थेमध्ये या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. सुरुवातीपासूनच बँकेच्या कौशल्यवृध्दी आणि जीवनव्यापन कार्यक्रमांनी ९.६ लाख लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम घडवला आहे. एचडीएफसी बँकेच्या परिवर्तन चा दृष्टिकोन हा कौशल्य विकासाची औपचारिक, प्रमाणनावर आधारीत प्रशिक्षण देऊन जीवनव्यापन आणि व्यावसायिक प्रशिक्षण हे स्थानिक स्तरानुसार आहे. त्यांच्या बाजारपेठेतील भागीदार आणि एनएसडीसी प्रमाणित संस्थांच्या सहकार्याने विविध प्रमाणन कार्यक्रमांच्या माध्यमातून १.९६ लाख तरुणांना विविध क्षेत्रातील औपचारिक प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये आरोग्य, रिटेल, वाहतूक, आदरातिथ्य, बँकिंग, विमा, ईव्ही देखभाल, आयटी आणि डिजिटल तंत्रज्ञान यांचा समावेश आहे. या कार्यक्रमांबरोबरच त्यांना सॉफ्ट स्कील्स, डिजिटल साक्षरता, वित्तीय साक्षरता आणि नोकरीतही सहकार्य केले जाते, ज्यामुळे तरुणांना शाश्वत रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. बँकेने कौशल्याच्या या पध्दतींना सक्षम करत उपक्रमांचे अशा प्रकारे डिझाईन केले आहे ज्यामुळे तरुणाईला रोजगाराच्या संधी मिळतात विशेष करुन गरीब समाजासह तरुण मुलींना याचा अधिक लाभ होतो. तरुणांच्या कौशल्य विकासा बरोबरच एचडीएफसी बँक परिवर्तन ने त्यांच्या समाजावर आधारीत प्रशिक्षण, व्यावसायिक विकास आणि बाजारपेठेशी जोडलेल्या सहकार्याच्या माध्यमातून ७.६ लाख महिला आणि शेतकऱ्यांसाठीही संधी निर्माण केली आहे. हे सहकार्य विविध क्षेत्रात असून यामध्ये शिवणकाम, हस्तमाग, खाद्य प्रक्रिया, पोल्ट्री फार्मिंग, दुग्धव्यवसाय व्यवस्थापन, सेंद्रीय शेती, मशरुम पिकवणे आणि अन्य सुक्ष्म व्यवसाय क्षेत्रांचा समावेश आहे. प्रशिक्षणा व्यतिरिक्त लाभार्थ्यांना मुल्य शृंखले मध्येही सहकार्य केले जात असून उपकरणे, देखभाल, उत्पादक संघ, ब्रॅन्डिंग, पॅकेजिंग आणि बाजारपेठेशी जोडणी इत्यादींचा समावेश आहे. बँकेच्या परिणामाच्या अभ्यासातून असे दिसून येते की अशा प्रकारच्या सहकार्यामुळे सहभागी लोकांवर चांगला आर्थिक परिणाम आणि सक्षमता निर्माण झाली आहे, विशेष करुन महिलांसह स्वयंसहायता गट तसेच व्यवसायावर आधारीत कार्यक्रमांमुळे उत्पन्न निर्मिती होऊन बचत होऊन आर्थिक स्वातंत्र्यात वाढ झाली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### एचडीएफसी बँकेची 2025-26 मध्ये दमदार आर्थिक कामगिरी



पुणे (आरंभ पर्व) : एचडीएफसी बँकेने आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये जागतिक पातळीवरील आर्थिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव आणि व्यापारातील चढ-उतार असूनही मजबूत आर्थिक कामगिरी केली. या आर्थिक वर्षात बँकेचे कर्जवाटप 12.1 टक्क्यांनी वाढून 29.37 लाख कोटींवर, तर ठेवी 14.4 टक्क्यांनी वाढून 31.05 लाख कोटींवर पोहोचले. निव्वळ महसूल 1.91 लाख कोटी आणि करानंतरचा निव्वळ नफा 10.9 टक्क्यांनी वाढून 74,671 कोटी झाला. यासोबतच ग्राहकांना अधिक सुरक्षित, जलद आणि सोपी बँकिंग सेवा देण्यासाठी बँकेने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा आणि मजबूत व्यवस्थापनावर विशेष भर दिला. एचडीएफसी बँकेचे अध्यक्ष केकी एम. मिस्त्री म्हणाले, " जागतिक पातळीवर अनेक आव्हाने असली तरी भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे. एचडीएफसी लिमिटेडच्या विलीनीकरणामुळे गृहनिर्माण कर्ज व्यवसायाला चांगला फायदा झाला आहे. भविष्यात बँकिंग क्षेत्रात जनरेटिव्ह एआयची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार असून, ग्राहकांचा विश्वास, पारदर्शकता आणि चांगले व्यवस्थापन कायम ठेवत आम्ही नावीन्यपूर्ण सेवा देत राहू. तसेच, एचडीएफसी बँकेचे एमडी आणि सीईओ शशिधर जगदीशन म्हणाले, "बँकेने मजबूत आर्थिक वाढीसोबत उच्च दर्जाची मालमत्ता गुणवत्ता कायम राखली आहे. ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी तसेच बँकेचे काम अधिक जलद आणि सोपे करण्यासाठी आम्ही एआय आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा अधिक वापर करत आहोत. भविष्यातही सुरक्षित, वेगवान आणि अखंड बँकिंग सेवा देण्यासाठी सातत्याने गुंतवणूक करत राहू."

### एअरटेलने संपूर्ण ओडिशामधील आपले नेटवर्क अधिक मजबूत केले

भुवनेश्वर (आरंभ पर्व) : भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा प्रदाता कंपन्यांपैकी एक, भारती एअरटेल ("एअरटेल") ने पुरी रथयात्रेच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण ओडिशामध्ये आपल्या व्यापक नेटवर्क विस्ताराची घोषणा केली. वार्षिक रथयात्रेदरम्यान व्हॉइस आणि डेटा ट्रॅफिकमध्ये होणारी मोठी वाढ लक्षात घेऊन, एअरटेलने आगाऊ तयारीचा भाग म्हणून पुरीमधील आपल्या नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चरला अधिक मजबूत केले आहे. यामध्ये पवित्र नगरीकडे जाणारे सर्व प्रमुख रस्ते आणि रेल्वे मार्गांचा समावेश आहे. 5G सेवेसह सुसज्ज असलेला हा विस्तार नेटवर्कवरील अपेक्षित वाढीव मागणी प्रभावीपणे हाताळण्यासाठी तसेच भाविकांची सर्वाधिक गर्दी असताना हाय-स्पीड डेटा सेवांसह अखंड व्हॉइस कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करण्यासाठी करण्यात आला आहे. गेल्या 12 महिन्यांत कंपनीने राज्यभरात 1,500 हून अधिक नवीन 5G साइट्स उभारल्या आहेत. त्यामुळे ओडिशातील 30 जिल्ह्यांमध्ये तिचे नेटवर्क कव्हरेज लक्षणीयरीत्या मजबूत झाले असून, शहरी भाग, विकसित होत असलेली शहरे तसेच ग्रामीण समुदायांमध्ये राहणाऱ्या 1.1 कोटींहून अधिक ग्राहकांना विश्वासार्ह हाय-स्पीड कनेक्टिव्हिटी उपलब्ध होत आहे.

### वीज वितरण व्यवस्थेवर वाढता ताण : तातडीने उपाययोजनांची गरज

मुंबई (आरंभ पर्व) : महाराष्ट्रात वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याची समस्या आता केवळ तात्पुरती अडचण राहिलेली नाहीत, या घटनांमुळे राज्याच्या वीज वितरण व्यवस्थेतील उणिवा समोर येत आहेत. नागपुरातील ट्रान्सफॉर्मर बिघाड, मुंबईतील दीर्घकाळ वीज खंडित होणे आणि नवी मुंबईतील नागरिकांच्या आंदोलनांमुळे वाढती वीज मागणी, अतिवृष्टी आणि उष्णतेच्या काळात वितरण यंत्रणेवर मोठा ताण येत असल्याचे दिसून येत आहे. मुंबई आणि आसपासच्या भागात वेगाने वाढणारे शहरीकरण होत असल्याने वीज वितरण यंत्रणेचा वेळेवर विस्तार आणि आधुनिकीकरण करणे आवश्यक झाले आहे. यंदाच्या उन्हाळ्यात खारघरसारख्या भागांत सहा तास वीजपुरवठा बंद होता. नागपुरात विक्रमी वीज मागणीमुळे ट्रान्सफॉर्मर बिघाड झाले आणि अनेक भागांत र्घकाळ वीज खंडित झाली, तर पुण्यात काही भागांमध्ये 24 तासांहून अधिक काळ वीजपुरवठा बंद राहिला, तर नवी मुंबईत वारंवार होणाऱ्या वीज खंडित होण्याच्या घटनांमुळे नागरिकांनी आंदोलन केले. ट्रान्सफॉर्मरवरील वाढता ताण, दुरुस्तीत होणारा विलंब आणि अपुरे नियोजन याबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. वारंवार होणाऱ्या वीज खंडित होण्यामुळे केवळ दैनंदिन जीवन विस्कळीत होत नाही, तर विद्युत सुरक्षेचे आणि ग्राहकांच्या सुरक्षेचेही प्रश्न निर्माण होतात. व्होल्टेजमधील चढ-उतारांमुळे विद्युत उपकरणांचे नुकसान होऊ शकते. काही ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बिघाडाच्या घटनांमुळे विद्युत सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली असून, वीज वितरण यंत्रणेची नियमित देखभाल आणि आधुनिकीकरणाची गरज अधोरेखित झाली आहे. याशिवाय, वीज कंपन्यांकडून वेळेवर माहिती न मिळणे आणि तक्रारींवर उशिरा प्रतिसाद मिळाल्यामुळे ग्राहकांचा विश्वास कमी होत आहे. दीर्घकाळ वीज नसल्याचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि सतत वीजेवर अवलंबून असलेल्या रुग्णांना बसतो. विशेषतः उष्णतेच्या काळात अशा घटना सार्वजनिक आरोग्य आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर ठरू शकतात.

### ९ कर्मचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू; व्यवस्थापनाकडून कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट

ANTONY WASTE

पिंपरी चिंचवड (आरंभ पर्व) : एंटनी वेस्टने अत्यंत दुःखद मनाने जाहीर केले आहे की, कंपनीच्या वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाला लागून असलेल्या लँडफिल परिसरात झालेल्या नैसर्गिक आपत्तीत कंपनीच्या नऊ कर्मचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीचे मोठे नुकसान झाले. दुर्घटनेच्या वेळी इमारतीत 23 कर्मचारी उपस्थित होते. हे सर्व कर्मचारी एंटनी लारा परिवाराचा भाग होते आणि त्यांच्या निधनामुळे संपूर्ण संस्थेवर शोककळा पसरली आहे. या कठीण प्रसंगी बचाव आणि मदत कार्यात तत्काळ सहभागी झालेल्या नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स (एनडीआरएफ), भारतीय सेना, अग्निशमन दल, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी), स्थानिक प्रशासन तसेच सर्व स्वयंसेवकांचे कंपनीने मनापासून आभार मानले आहेत. त्यांच्या तात्काळ, जलद आणि निःस्वार्थ प्रयत्नांमुळे 14 कर्मचाऱ्यांचे प्राण वाचवण्यात यश आले. या कर्मचाऱ्यांवर सध्या वैद्यकीय उपचार सुरू असून त्यांना समुपदेशनाचीही सुविधा दिली जात आहे.

# काकासाहेब चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

## धायरीसह समाविष्ट गावातील पाणीप्रश्नाबाबत अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांची पाहणी

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी व प्रभाग क्रमांक ३३ मधील पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर व मुख्य अभियंता (पाणीपुरवठा) नंदकिशोर जगताप यांनी आज धायरी परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पुणे महानगरपालिकेतील गटनेते व नगरसेवक काकासाहेब चव्हाण यांनी या प्रश्नाबाबत सातत्याने केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत ही पाहणी करण्यात आली.

धायरीसह समाविष्ट गावात प्रत्येक पावसाळ्यात मुसळधार पावसानंतर पाणीपुरवठ्याच्या स्रोतांमध्ये गढूळ व दूषित पाणी मिसळत असल्याने हजारो नागरिकांना अस्वच्छ व अपुरा पाणीपुरवठा सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा गंभीर प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी काकासाहेब चव्हाण यांनी पुणे महानगरपालिकेकडे वारंवार पाठपुरावा केला होता. त्यासोबतच सभागृहातही हा प्रश्न उपस्थित केला होता.





> अतिरिक्त आयुक्त मा. पवनीत कौर मॅडम तसेच पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता मा. नंदकुमार जगताप साहेब यांनी हा प्रकल्प प्राधान्याने मार्गी लावून समाविष्ट गावांतील नागरिकांना स्वच्छ, शुद्ध आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात येईल, असे आश्वासन दिले. समाविष्ट गावांतील नागरिकांना कायमस्वरूपी व गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा मिळावा, यासाठी माझा पाठपुरावा यापुढेही सातत्याने सुरू राहील. **- सोपान ऊर्फ काकासाहेब चव्हाण, नगरसेवक, पुणे महानगरपालिका**

आज झालेल्या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी बारंगणी मळा येथील विहीर, परिसरातील पाणीपुरवठा टाक्या तसेच पाणीपुरवठा यंत्रणेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक त्या उपाययोजना हाती घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी काकासाहेब चव्हाण यांनी धायरीकरांना वर्षभर पुरेसे, शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी विविध पर्यायी उपाययोजना अतिरिक्त आयुक्तांसमोर मांडल्या. तसेच समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत व्यंकटेश सेरेनिटी येथे उभारण्यात आलेल्या टाकीची झालेली दुरवस्था निदर्शनास आणून देत तेथे तातडीने दुरुस्ती व आवश्यक कामे करण्याची मागणी केली. याशिवाय धायरी परिसराचा वाढता विस्तार लक्षात घेता भविष्यातील पाणीगरज पूर्ण करण्यासाठी नवीन जलसाठा व्यवस्था, पाणी साठवण क्षमता वाढविणे, पाणीपुरवठा यंत्रणेचे सक्षमीकरण तसेच क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून दीर्घकालीन नियोजन करण्याची आवश्यकता असल्याचे काकासाहेब चव्हाण यांनी यावेळी नमूद केले. यावर अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सर्व बाबींची सविस्तर तपासणी करून नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध होण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच दीर्घकालीन उपाययोजनांबाबतही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या पाहणीदरम्यान नगरसेविका अनिता इंगळे, नगरसेविका धनश्री कोल्हे, नगरसेवक सुभाष नाणेकर, संदीप चव्हाण, दशरथ मणेरे यांच्यासह पाणीपुरवठा विभागांचे अधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

समाविष्ट १२ गावांसाठी पुणे महानगरपालिकेने तयार केलेल्या डीपीआर (DPR) अंतर्गत प्रस्तावित जलशुद्धीकरण केंद्र (WTP) प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जागेचीही पाहणी करण्यात आली. सदर जागा सीडब्ल्यूपीआरएस (CWPRS) संस्थेच्या मालकीची असून, ती पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी केंद्र शासनाकडे नियमानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

## ‘आईकु झेड११ लाइट’ २४ जुलैला होणार दाखल

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

उच्च कार्यक्षमतेच्या स्मार्टफोनसाठी ओळखला जाणारा आईकु हा ब्रँड २४ जुलै रोजी आपला नवीन आईकु झेड११ लाइट हा स्मार्टफोन भारतीय बाजारात सादर करणार आहे. विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित अनेक आधुनिक सुविधा, मोठी बॅटरी, मजबूत बांधणी आणि आकर्षक रचना देण्यात आली आहे. ऑनलाइन व्याख्याने, असाइनमेंट तयार करणे, नोंदी लिहिणे, दैनंदिन अनेक कामे एकाच वेळी हाताळणे आणि मनोरंजन अशा सर्व




गरजांसाठी हा स्मार्टफोन उपयुक्त ठरेल, असा कंपनीचा दावा आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, "अखंड शिक्षण, अखंड कार्यक्षमता" या संकल्पनेवर आधारित हा स्मार्टफोन विकसित करण्यात आला असून तो नवीन ओरिजिन ओएस ६ या कार्यप्रणालीवर चालणार आहे. यासोबतच ग्राहकांना चार वर्षांची सुरक्षा अद्यतने मिळणार असल्यामुळे दीर्घकाळ सुरक्षित वापराचा अनुभव मिळेल.

## सुमीत ग्रुप आणि सुमीत एसएसजीकडून वारकऱ्यांना वैद्यकीय मदत

### अत्याधुनिक रुग्णवाहिकांमुळे दोन जणांचे प्राण वाचले

**पिंपरी चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

सुमीत ग्रुप एंटरप्रायझेस आणि सुमीत एसएसजी यांनी आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांसाठी विशेष वैद्यकीय मदत उपक्रम राबविला. या उपक्रमात दोन जणांचे प्राण वाचवण्यात यश आले असून, शेकडो वारकऱ्यांना औषधे आणि प्राथमिक उपचार देण्यात आले.

हा उपक्रम ९ ते ११ जुलैदरम्यान राबविण्यात आला. यावेळी पिंपरी, भोसरी, ज्ञानेश्वर पादुका चौक (एफसी रोड), भवानी पेठ, रास्ता पेठ, हडपसर, लोणी काळभोर आणि दिवे घाट अशा एकूण आठ ठिकाणी वैद्यकीय शिबिरे आयोजित करण्यात आली.



या शिबिरांमध्ये मोठ्या प्रमाणात वारकरी उपचारासाठी आले होते. या शिबिरांमधील डॉक्टरांनी डिहायड्रेशन, स्नायूंचा थकवा, पायांना आलेले फोड आणि सांधेदुखी यांसारख्या समस्यांनी त्रस्त असलेल्या भाविकांच्या समस्यांवर उपचार केले. या उपक्रमासाठी सुमीत एसएसजीने एक अँडव्हान्स्ड लाइफ सपोर्ट (ALS) आणि दोन बेसिक लाइफ सपोर्ट (BLS) रुग्णवाहिका तैनात केल्या होत्या. या रुग्णवाहिकांमध्ये आधुनिक आणि युरोपियन दर्जाची वैद्यकीय उपकरणे बसविण्यात आली होती. या रुग्णवाहिका लवकरच महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा (MEMS 108) ताफ्यात दाखल होणार आहेत. या दरम्यान दोन गंभीर आपत्कालीन घटनांमध्ये वैद्यकीय पथकाने तातडीने मदत केली. एफसी रोड येथे एका वारकऱ्याची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना घटनास्थळी उपचार देऊन ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच दिवे घाट येथे दुसऱ्या एका व्यक्तीला रुग्णवाहिकेमध्ये प्राथमिक उपचार देऊन सासवड ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले.

## क्रीडा क्षेत्राला उभारी देण्यासाठी कटिबद्ध असल्याची उपमहापौरांची ग्वाही

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पुणे शहराला उत्तम खेळाडूंची दैदीप्यमान परंपरा आहे. ही परंपरा कायम राखण्यासाठी आणि क्रीडा क्षेत्राला उभारी देण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी दिली. फिफा फुटबॉल विश्वचषक 2026 निमित्त गेम ऑफ गोल एफसीसी अकादमीच्या वतीने खेळाडूंना प्रोत्साहन देण्याची भूमिका सातत्याने घेतल्याबद्दल वाडेकर यांचा विश्वचषकाची प्रतिकृती देऊन सन्मान करण्यात आला. अकादमीचे प्रशिक्षक सुशील जोसेफ यांच्या हस्ते ही प्रतिकृती देण्यात आली.

## श्रीराम मंदिर चोरीप्रकरणी धायरीत संताप

- **श्रीरामरक्षा पठण व महाआरतीत कठोर कारवाईची मागणी**

**धायरी, पुणे (दै. आरंभ पर्व)**

श्रीराम मंदिरातील चोरीच्या घटनेच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या वतीने धायरी येथील साई मंदिर परिसरात श्रीरामरक्षा पठण व महाआरतीचे आयोजन करण्यात आले. शेकडो रामभक्त, ज्येष्ठ नागरिक, कारसेवक, शिवसैनिक आणि नागरिकांनी या आंदोलनात्मक धार्मिक कार्यक्रमात सहभागी होत चोरीप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

श्रीरामाच्या नामघोषात पार पडलेल्या या कार्यक्रमात उपस्थितांनी मंदिरांवरील वाढत्या चोरीच्या घटनांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. मंदिरांमध्ये सुरक्षिततेच्या उपाययोजना अधिक प्रभावी करण्याची गरज असून, अशा घटनांमुळे भाविकांच्या श्रद्धेला धक्का बसत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी खडकवासला विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते म्हणाले, "श्रीराम मंदिरातील चोरी ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रकरणातील दोषींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा झाली पाहिजे. शासनाने कोणालाही पाठीशी न घालता निष्पक्ष कारवाई करावी. मंदिरांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याची आवश्यकता आहे. श्रीरामावरील श्रद्धा आणि जनतेच्या भावना लक्षात घेऊन शासनाने जबाबदारीने वागावे. या घटनेच्या निषेधार्थ राज्यभर श्रीरामरक्षा पठणाचे कार्यक्रम सुरू राहतील."

या वेळी पुणे जिल्हाप्रमुख प्रकाश भेगडे, पुणे शहर सहसंपर्कप्रमुख गजानन थरकुडे, हवेली तालुकाप्रमुख तानाजी पवळे, युवासेना जिल्हाप्रमुख बाळकृष्ण वांजळे, शहर संघटक अमोल कदम, उपतालुकाप्रमुख संदीप शिंदे, शाखाप्रमुख रोहित जगताप, महिला आघाडी अध्यक्षा स्वाती पाटील, युवासेना पदाधिकारी सचिन भोसले, तसेच प्रमुख उपस्थित म्हणून माजी नगरसेवक राजेंद्र शिंदे, सामाजिक कार्यकर्ते महेश कदम, उद्योजक संजय पाटील, तसेच इतर शिवसेनेचे पदाधिकारी, कारसेवक, रामभक्त आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यामध्ये कार सेवक संतोष कुंभार, अशोक वेल्हाळ, महेशराव मते, भरत आबा कुंभारकर, नितीन जगताप, बुवा खाटपे, निवृत्ती वाहोळ, राहुल दादा घुले, अविनाश सरोदे, एडवोकेट राजेश मिंडे, संजय पोकळे, विलासराव भोसले, नेताजी बाबर, संदीप रायकर, बाळासाहेब हनमघर, मिलिंद गवळी, बाळासाहेब मंडलिक, सिद्धार्थ पोकळे, सुरेश भाऊ पोकळे, शंकर महाराज ढोणे, सुरेश देशमुख, बाळासाहेब राऊत, आकाश बालवडकर, निखिल जावळकर, जितेंद्र सपकाळ, शांताराम पडर, शिवाजी शिर्के, गणेश भाऊ पाटील, बिरामणे मामा, अक्षय सणस, बाबुराव पोकळे, नाना यादव, कृष्ण बांदल, सुशांत पोकळे आदींचा समावेश होता.

## ज्या शाळेने घडवलं, त्याच शाळेने कृतज्ञतेने केला गौरव






### नगरसेवक सचिन मोरे यांचा भावनिक सत्कार

**पुणे-खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

एखाद्या विद्यार्थ्याच्या आयुष्यात शाळा ही केवळ शिक्षणाची जागा नसते, तर ती त्याच्या स्वप्नांना आकार देणारी पहिली गुरुकिल्ली असते. अशाच आपल्या जडणघडणीचा पाया असलेल्या यशवंत विद्यालय, खडकवासला येथे पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक तसेच सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समितीचे अध्यक्ष सचिन भाऊ मोरे यांचा त्यांच्या मातृसंस्थेकडून अत्यंत भावनिक वातावरणात सत्कार करण्यात आला.

ज्या वर्गखोल्यांमध्ये त्यांनी शिक्षणाचे धडे गिरवले, ज्या शिक्षकांनी त्यांच्यावर संस्कार केले आणि ज्या शाळेने त्यांना आयुष्याची दिशा दिली, त्याच विद्यालयाच्या प्रांगणात झालेला हा सत्कार उपस्थितांसाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा क्षण ठरला. यावेळी यशवंत विद्यालय स्कूल कमिटीचे सदस्य अशोक भाऊ मते, विलास अण्णा मते, सुहास भाऊ मते, रमेशबापू गायकवाड, विजयभाऊ मते, अनिलभाऊ मते, सुरेशतात्या मते, विलास तात्या मते, आनंद भाऊ मते, विजय भाऊ कोल्हे, सचिन भाऊ मते, अमर भाऊ शेळके, संजय भाऊ ठोंबरे, विद्यालयाचे फडतरे सर, शिक्षक-शिक्षिका तसेच खडकवासला गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना नगरसेवक सचिन मोरे यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा देत, "आज मी ज्या पदावर आहे, त्यामागे या विद्यालयाचे आणि माझ्या शिक्षकांचे मोठे योगदान आहे. या शाळेचे माझ्यावर असलेले ऋण मी कधीही विसरू शकत नाही," अशी भावना व्यक्त केली. यावेळी त्यांनी विद्यालयासमोरील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची ग्वाही दिली. विशेषतः विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र व सुसज्ज शौचालयाचे बांधकाम लवकर पूर्ण करण्यात येईल, तसेच विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी आधुनिक वॉटर फिल्टर प्लांट उभारण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा त्यांनी केली.

मोरे यांच्या या घोषणेचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. शाळेचा एक विद्यार्थी नगरसेवक बनून पुन्हा आपल्या मातृसंस्थेच्या विकासासाठी पुढाकार घेत असल्याचे पाहून शिक्षक, ग्रामस्थ आणि माजी विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत अभिमान आणि समाधान दाटून आले. 'विद्यार्थी म्हणून सुरू झालेला प्रवास आज समाजसेवेच्या शिखरापर्यंत पोहोचला; मात्र मातृसंस्थेचे ऋण फेडण्याची भावना कायम जिवंत ठेवणाऱ्या सचिन मोरे यांच्या या कृतीने उपस्थित प्रत्येकाच्या मनाला स्पर्श केला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ज्ञानप्रसाद विद्यापीठाचा नानयांग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटसोबत करार

पुणे (आरंभ पर्व) : डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीच्या ज्ञानप्रसाद ग्लोबल विद्यापीठाच्या स्कूल फॉर हॉस्पिटॅलिटी अँड टुरिझमने सिंगापूरमधील नानयांग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटसोबत सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या करारामुळे भारत आणि सिंगापूरमधील हॉस्पिटॅलिटी व पर्यटन शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, शैक्षणिक संसाधनांची देवाणघेवाण आणि अध्यापनातील सर्वोत्तम पद्धतींची अंमलबजावणी केली जाणार आहे. या करारावर विद्यापीठाच्या वतीने स्कूल फॉर हॉस्पिटॅलिटी अँड टुरिझमचे संचालक डॉ. प्रद्युम्न राठोड, तर नानयांग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने उपाध्यक्ष (एसआरए) श्री. खूरेमंड, उपसंचालक सुश्री टॅनी आणि भारतासाठी सहाय्यक देश व्यवस्थापक श्री. हर्ष पगारिया उपस्थित होते. यावेळी प्रो-चान्सलर डॉ. सोमनाथ पी. पाटील म्हणाले, “विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, आंतरराष्ट्रीय अनुभव आणि विविध संस्कृतींमध्ये कार्य करण्याची क्षमता मिळावी, यासाठी ही भागीदारी महत्त्वपूर्ण ठरेल. जागतिक हॉस्पिटॅलिटी आणि पर्यटन क्षेत्रातील संधींसाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे.”

### ए रायझिंग सायन प्रीस्कूलमध्ये पालखी सोहळा उत्साहात



पुणे (आरंभ पर्व) : आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर अरहम फाउंडेशन संचालित ए रायझिंग सायन प्रीस्कूलमध्ये पारंपरिक पालखी सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात चिमुकल्या बाल वारकऱ्यांनी त्यांच्या माता आणि आजींसह पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभाग नोंदवला. टाळ-मृदंगाच्या गजरात अभंग गायन, भजन व दिंडी काढून महाराष्ट्राच्या वारकरी परंपरेचा अनुभव लहानग्यांनी घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, संस्कार व भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्यात आली. श्रद्धा, एकता, नम्रता आणि कृतज्ञता या मूल्यांचे महत्त्व यावेळी पटवून देण्यात आले. या कार्यक्रमाला अरहम फाउंडेशनच्या उपाध्यक्षा प्रीती पगारिया आणि सदस्या राजश्री पगारिया यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रीस्कूलच्या प्राचार्या श्रीमती पूजा ठक्कर तसेच शिक्षिका नियती ठक्कर आणि संध्या यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. भारतीय परंपरा आणि मूल्यांचे जतन अनुभवाधारित शिक्षणातून करण्याच्या प्रीस्कूलच्या उपक्रमाचे यानिमित्ताने कौतुक करण्यात आले.



### यशस्विनी महिला बचत गटातर्फे अक्कलकोट तीर्थयात्रेचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : यशस्विनी महिला बचत गटाच्या वतीने श्री स्वामी समर्थांच्या पावनभूमी अक्कलकोट येथे भक्तिमय सहलीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या सहलीमध्ये महिला सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत स्वामी समर्थांचे दर्शन घेतले तसेच अध्यात्मिक वातावरणाचा आनंद लुटला. या सहलीचे नियोजन व आयोजन यशस्वी करण्यासाठी बचत गटाच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजाराम डांगे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच गटाचे कामकाज पाहणाऱ्या सौ. वनिता चौगुले यांनी संपूर्ण नियोजनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. यावेळी सौ. रोहिणी पवार, सौ. किशोरी सांगळे, श्रीमती लक्ष्मी बोनगरगे, श्री. राजाराम डांगे, साक्षी डांगे, ऋतुजा गोंधळी, श्रेयशा शिंदे, सौरभ गायकवाड आणि श्री. बंडू मोरे यांनी सहलीच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. सहलीदरम्यान सर्वांनी श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेऊन आरती व प्रार्थना केली. परस्परांतील स्नेह, एकोप्याची भावना आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करण्यास अशा सहली उपयुक्त ठरतात, अशी भावना सहभागी सदस्यांनी व्यक्त केली. यशस्विनी महिला बचत गटाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, भविष्यातही अशा सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजक सौ. सुनीता डांगे यांनी सांगितले.

### महापालिकेतील पाणीपुरवठा विभागातील अधिकारी निलंबित

पुणे (आरंभ पर्व) : महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता अशित वेदप्रकाश जाधव यांना तातडीने निलंबित करण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध खातेनिहाय चौकशीचे आदेशही देण्यात आले आहेत. अतिरिक्त महापालिका आयुक्त प्रजित नायर यांच्या स्वाक्षरीने हा आदेश जारी करण्यात आला. मात्र, निलंबनाचे नेमके कारण आदेशात नमूद करण्यात आलेले नसल्याने महापालिका वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. राजकीय दबाव तसेच महापालिका आयुक्तांना पाठविलेल्या एका संदेशामुळे ही कारवाई झाल्याची चर्चा रंगली आहे. निलंबन आदेशानुसार, ११ जुलै रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने जाधव यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. मात्र, त्या दिवशी नेमकी कोणती घटना घडली, आयुक्तांना त्यांनी कोणता संदेश पाठविला आणि त्यातील मजकूर काय होता, याचा कोणताही उल्लेख आदेशात करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५६ (२) (फ) अंतर्गत विभागीय चौकशी प्रलंबित असताना ही कारवाई करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. महापालिका वर्तुळातील चर्चेनुसार, अवघ्या दीड महिन्यांपूर्वीच जाधव यांची पाणीपुरवठा विभागात बदली करण्यात आली होती. या बदलीबाबत ते नाराज असल्याचे सांगितले जाते. त्यानंतर ते महिनाभर रजेवर गेले होते.

## “काम झाले पण जिवाची किंमत कोण मोजणार?”

### नऱ्हेतील गंधर्व चौकातील विदारक वास्तव







**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"ड्रेनेज लाईनचे काम झाले, पण त्यानंतर उघड्यावर पडलेले खड्डे, मोडकळीस आलेला रस्ता आणि कचऱ्याने भरलेली नाली हेच आज नऱ्हेतील गंधर्व चौकाचे वास्तव बनले आहे.

अनेक दिवस उलटून गेले, तरीही काम पूर्ण करण्याची तसदी पुणे महानगरपालिकेच्या यंत्रणांनी घेतलेली नाही. मुख्य रस्त्याच्या पुलावरच कडेलाच उघडा खड्डा असल्याने दररोज हजारो नागरिक, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वार जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत.

पीएमपीएमएल बस आणि इतर मोठी वाहने या अरुंद रस्त्यावरून जात असताना क्षणोक्षणी भीतीचे वातावरण निर्माण होत आहे.

नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासनांचे डोस मिळाले. प्रत्यक्षात मात्र परिस्थिती 'जैसे थे' आहे. एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल सध्या उपस्थित होत आहे. पावसाळा सुरू असल्याने हा खड्डा आणखी धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. एखादा दुचाकीस्वार घसरला किंवा पादचारी तोल जाऊन पडला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न आज प्रत्येक नागरिकाच्या मनात आहे. मोठी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता गंधर्व चौकातील हा रस्ता तात्काळ पूर्ववत करावा आणि नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ त्वरित थांबवा.. असलेले जाळी पूर्णपणे बंदिस्त करून उपायोजना करावे असे आवाहन पुणे महानगरपालिकेला नागरिकांनी केले आहे.


## नऱ्हे व धायरी परिसरात मतदार पडताळणी मोहीम सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक ठेवण्यासाठी सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) मोहिमेमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन भाजप प्रभाग क्र. ३४चे अध्यक्ष राजूदादा कुटे यांनी केले आहे.

या मोहिमेअंतर्गत बूथ लेव्हल अधिकारी (BLO) नागरिकांच्या घरी भेट देऊन मतदार पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करत आहेत. तसेच आवश्यक कागदपत्रांसह नागरिकांनी स्वतःही ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करून आपले नाव व माहिती मतदार यादीत योग्य असल्याची खात्री करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या जनजागृती अभियानात माजी उपसरपंच सतीश कुटे, भाजप महिला मोर्चा उपाध्यक्ष सौ. कोमल सतीश कुटे यांच्यासह कार्यकर्ते नागरिकांना मार्गदर्शन करत आहेत. "आज केलेली थोडीशी सुरुवात उद्याच्या मोठ्या अडचणी टाळू शकते. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने एसआयआर मतदार पडताळणी मोहिमेमध्ये सहभाग नोंदवून लोकशाही अधिक बळकट करावी," असे आवाहन श्री.राजूदादा कुटे यांनी केले. या मोहिमेंतर्गत नऱ्हे, धायरी वडगाव येथे सर्वत्र हे अभियान निवडणूक आयोगातर्फे राबवले जात आहे सर्व मतदारांनी यामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.



- **एसआयआर मतदार पडताळणी मोहिमेमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा : राजूदादा कुटे**

## विश्व हिंदू परिषद - बजरंग दलातर्फे वृक्षारोपण अभियान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, उत्तमनगर यांच्या वतीने आज खडकवासला व कूडजे परिसरात भव्य वृक्षारोपण अभियान उत्साहात पार पडले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि हरित परिसर निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक सुभाष नाणेकर यांच्या हस्ते वृक्षरोपण करण्यात आले . यावेळी सरपंच अमोल कार्ले, उद्योजक संजय मांजरे, भाजपा युवा नेते सचिन कांबळे, दत्ताभाऊ नाणेकर, मुन्ना क्षीरसागर, सुनील पायगुडे, तसेच बजरंग दल उत्तमनगरचे अध्यक्ष अतुल अगरवाल यांच्यासह विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.



## जनता वसाहत परिसरात दोन नवीन घंटागाड्यांचा शुभारंभ

### ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पाठपुराव्याला यश; कचरा व्यवस्थापनाला मिळणार गती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जनता वसाहत परिसरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी माजी उपमहापौर तथा नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, परिसरासाठी दोन नवीन घंटागाड्या उपलब्ध झाल्या आहेत. वाघजाई मंदिराजवळ नारळ वाढवून या सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

जनता वसाहत हा दाट लोकवस्तीचा परिसर असल्याने वाढत्या कचऱ्यामुळे स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला होता. अपुऱ्या घंटागाड्यांमुळे अनेक ठिकाणी वेळेवर कचरा उचलला जात नव्हता. नागरिकांच्या तक्रारींनंतर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी पुणे महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा करून अतिरिक्त घंटागाड्यांची मागणी केली. त्यानुसार परिसरासाठी दोन नवीन घंटागाड्या मंजूर करण्यात आल्या.

या घंटागाड्या दररोज (साप्ताहिक सुट्टी वगळता) सायंकाळी ८ ते रात्री १०.३० या वेळेत परिसरात फिरणार आहेत. त्यामुळे नागरिकांना घराजवळच नियमित कचरा संकलनाची सुविधा मिळणार असून, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रकार कमी होण्यास मदत होईल. परिसर अधिक स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

यावेळी नागरिकांना ओला व सुका कचरा वेगळा करूनच घंटागाडीत देण्याचे आवाहन करण्यात आले. स्वच्छ शहर अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी केले. शुभारंभ कार्यक्रमास नगरसेविका सौ. वृषाली रिठे, सामाजिक कार्यकर्ते श्री. निलेश पवार तसेच जनता वसाहत परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पाठपुराव्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांचे आभार मानले.

## आश्वासनानंतर नागेश चव्हाण यांचे जलसमाधी आंदोलन मागे

### अतिक्रमणांवर तीन महिन्यांत कारवाईचे उपजिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन; ग्रामपंचायतीकडूनही लेखी पत्र



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील ज्योतिबाची वाडी येथील गायरान व ग्रामपंचायत हद्दीतील जमिनीवरील कथित अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी उजनी धरणात सुरू केलेले सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस नागेश चव्हाण यांचे जलसमाधी आंदोलन अखेर प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. आंदोलनाची दखल घेत निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी संबंधित प्रकरणात तीन महिन्यांच्या आत आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. तसेच ग्रामपंचायतीने सर्व कथित अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावून ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत ठराव मंजूर करून नियमानुसार अतिक्रमणे हटविण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल, असे लेखी पत्र नागेश चव्हाण यांना देण्यात आले.

गेल्या अनेक महिन्यांपासून नागेश चव्हाण यांनी या प्रकरणी पंचायत समिती, ग्रामपंचायत, महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाकडे वारंवार निवेदने देत कारवाईची मागणी केली होती. मात्र ठोस निर्णय न झाल्याने त्यांनी उजनी धरणात जलसमाधी आंदोलन सुरू केले होते.

प्रशासनाकडून मिळालेल्या लेखी आश्वासनानंतर चव्हाण यांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला. यावेळी त्यांनी सांगितले की, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी होते की नाही, यावर आमचे बारकाईने लक्ष राहील. तीन महिन्यांच्या मुदतीत कारवाई झाली नाही, तर 27 10 2026 रोजी यापेक्षाही तीव्र आंदोलन उभारण्यात येईल.

या आंदोलनामुळे ज्योतिबाची वाडीतील कथित अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, आता प्रशासन आणि ग्रामपंचायत दिलेल्या लेखी आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी करतात, याकडे ग्रामस्थांसह संपूर्ण बार्शी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांसाठी अर्ध्या शिक्षणशुल्कापर्यंत शिष्यवृत्ती

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ऑस्ट्रेलियातील अग्रगण्य संशोधनाधारित विद्यापीठांपैकी एक असलेल्या पश्चिम ऑस्ट्रेलिया विद्यापीठाने भारतातील मुंबई आणि चेन्नई येथील आपल्या शैक्षणिक परिसरांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात न जाता आपल्या देशातच जागतिक दर्जाचे शिक्षण घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त ऑस्ट्रेलियन पदवी मिळवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित आठ अग्रगण्य विद्यापीठांच्या समूहातील सदस्य असलेल्या या विद्यापीठाने गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना जाहीर केली आहे.

THE UNIVERSITY OF WESTERN AUSTRALIA
INDIA

आगामी प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्क्यांपर्यंत गुणवत्ता-आधारित शिष्यवृत्ती मिळू शकते. शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देणे आणि जागतिक दर्जाचे शिक्षण अधिकाधिक भारतीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा या योजनेचा उद्देश आहे. जागतिक विद्यापीठ क्रमवारी २०२६ मध्ये हे विद्यापीठ जगात ७७ व्या क्रमांकावर असून विविध विषयांमध्ये जगातील सर्वोच्च पन्नासमध्ये दहा विषयांचा समावेश आहे.

## आशा कार्यकर्त्यांच्या सेवाभावी कार्याचा मेडिकव्हर हॉस्पिटलकडून सन्मान




**पिंपरी- चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

समाजाच्या आरोग्यसेवेत मोलाचे योगदान देणाऱ्या आशा कार्यकर्त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी यांच्या वतीने ‘आशा कार्यकर्ती सन्मान सोहळा’ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात पिंपरी-चिंचवड परिसरातील ३५० हून अधिक आशा कार्यकर्त्या व टीम लीडर्स मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. या कार्यक्रमाला सौ. नम्रताताई योगेश लोंढे (नगरसेविका, इंद्रायणी नगर), सौ. चंद्राबाई कांबळे (अध्यक्षा, युनियन ऑफ ॲक्रेडिटेड सोशल हेल्थ ॲक्टिव्हिस्ट, पिंपरी-चिंचवड), सौ. सुप्रियाताई महेश चांडगुडे (नगरसेविका, शाहूनगर), सौ. आशा आहेर (उपाध्यक्षा, युनियन ऑफ ॲक्रेडिटेड सोशल हेल्थ ॲक्टिव्हिस्ट) तसेच सौ. गौरी गोळे (सचिव, भोसरी) प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी आरोग्य जनजागृती, लसीकरण, माता-बाल आरोग्य, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि नागरिकांना आरोग्य सुविधांशी जोडण्यामध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आशा कार्यकर्त्यांचा सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. तसेच सौ. प्रियंका फटिंग (यमुना नगर), सौ. संगीता मोरे (जिजामाता हॉस्पिटल), सौ. सुनीता अंकुश (सांगवी), सौ. वंदना जावरे (तेलारा हॉस्पिटल) आणि सौ. अम्रपाली फुले (थेरगाव) या आशा टीम लीडर्सचाही विशेष सन्मान करण्यात आला.

### मानाजी नगर आणि गोकुळनगर परिसरात

# रस्त्यावरून वाहतंय ड्रेनेज

### मनपा प्रशासनाकडून तातडीच्या कार्यवाहीची मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आम्हीही पुणेकरच ना...? आम्हालाही स्वच्छ रस्ते, सुरक्षित वातावरण आणि मूलभूत सुविधा मिळायला नकोत का?" असा संतप्त सवाल नऱ्हेतील गोकुळनगर मानाजीनगर परिसरातील नागरिकांनी पुणे महानगरपालिका प्रशासनाला केला आहे.

नऱ्हेगाव–मानाजी नगरमधील जाधवर चौक, ग्रीन लँड कंट्री सोसायटीसमोरील मुख्य रस्त्यावर ड्रेनेज लाईन वारंवार तुंबल्यामुळे मैलामिश्रित सांडपाणी रस्त्यावर साचत आहे. याशिवाय नऱ्हे धायरी फाटा रस्त्यावर गोकुळनगर परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून ही समस्या कायम असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. ह्या भागात ड्रेनेज व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याने अनेक ठिकाणी सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे. काही भागांमध्ये गटारांचे पाणी घरांच्या परिसरात शिरत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या दोन्ही भागांमध्ये दररोज शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच नोकरी-व्यवसायासाठी ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुर्गंधीयुक्त सांडपाणी, वाढलेला डासांचा प्रादुर्भाव आणि संसर्गजन्य आजारांचा धोका यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे हे सांडपाणी पुढे इतर रस्त्यांवरही वाहत असल्याने परिस्थिती दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला धारेवर धरले. ते म्हणाले, "पुणे महानगरपालिकेला नियमित कर भरणाऱ्या नागरिकांना मूलभूत सुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. वारंवार तक्रारी करूनही केवळ तात्पुरत्या उपाययोजना केल्या जातात. कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज आहे. अन्यथा या घाण पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल."

यावेळी नागरिकांनी या भागातील लोकप्रतिनिधींनीही या गंभीर समस्ये कडे लक्ष द्यावे असे आवाहन केले नागरिकांनी तातडीने ड्रेनेज लाईनची दुरुस्ती, नियमित साफसफाई आणि कायमस्वरूपी जलनिस्सारण व्यवस्था उभारण्याची मागणी केली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत, "आम्हाला आश्वासन नको, कायमस्वरूपी उपाय हवा," अशी ठाम भूमिका नागरिकांनी मांडली आहे.

> मी अनेक वर्षापासून या भागात राहतोय मात्र अजूनही ड्रेनेज समस्या सुटली नाही. तातडीने ठोस उपाययोजना करण्यात यावी. ही आमची मागणी आहे.
>
> **- रोहिदास जोरी पाटील, स्थानिक नागरिक**

## थोडक्यात पण महत्वाचे



### वीर शिवा काशीद यांच्या पुण्यतिथी निमित्त १,००० देशी वृक्षांचे वृक्षारोपण

कोल्हापूर (आरंभ पर्व) : वीर शिवा काशीद यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील खोतवाडी येथे ज्ञानज्योती फाउंडेशनच्या पुढाकाराने १,००० देशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात मोठ्या संख्येने ग्रामस्थ, विद्यार्थी आणि स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी गेल्या वर्षी लावण्यात आलेल्या ४०० वृक्षांचा "वाढदिवस" साजरा करून त्यांचे संगोपन करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. या अभियानासाठी ब्रह्मांड संस्थान सामाजिक राष्ट्रसेवा, पुणे यांच्या माध्यमातून तसेच वृक्षवल्ली नर्सरी, देवरुख यांच्याकडून ५०० देशी वृक्ष उपलब्ध करून देण्यात आले. ज्ञानज्योती फाउंडेशनचे सेवेकरी डॉ. निलेश पाटील, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, ग्रामस्थ, स्वयंसेवक आणि विद्यार्थी यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाला. या कार्यात श्री. हेमंत तांबे यांनी ब्रह्मांड संस्थानच्या पर्यावरणविषयक उपक्रमांना मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या योगदानाबद्दल आयोजकांनी त्यांचे विशेष आभार व्यक्त केले. सन २०13 पासून ब्रह्मांड संस्थान सामाजिक राष्ट्रसेवा, पुणे ही संस्था पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनासाठी सातत्याने कार्यरत असून, "सर्व वृक्षसेवा भारत मातेच्या चरणी अर्पण" हा संस्थेचा संदेश पर्यावरण संरक्षणाची प्रेरणा देणारा ठरत आहे.

### सौदीकडून 'पॅकेज व्हिसा'ची घोषणा




रियाध (आरंभ पर्व) : जगभरातील पर्यटकांसाठी प्रवास अधिक सोपा आणि अखंड करण्याच्या उद्देशाने सौदी अरेबियाने 'पॅकेज व्हिसा' हा नवा डिजिटल उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत पर्यटक व्हिसासाठीची अर्ज प्रक्रिया थेट प्रवास बुकिंगशी जोडण्यात आली असून, विमानप्रवास, निवास व्यवस्था आणि व्हिसा अर्ज ही संपूर्ण प्रक्रिया एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर पूर्ण करता येणार आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी सुरुवातीला निवडक आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये पात्र प्रवास आणि पर्यटन सेवा प्रदात्यांमार्फत टप्प्याटप्प्याने करण्यात येत असून, पुढील काळात त्याचा व्यापक विस्तार करण्यात येणार आहे. सौदी सरकारने यापूर्वी ई-व्हिसा, व्हिसा ऑन अरायव्हल आणि स्टॉपओव्हर ट्रान्झिट व्हिसा यांसारखे विविध प्रवेश पर्याय उपलब्ध करून पर्यटन क्षेत्राला चालना दिली आहे. या उपाययोजनांमुळे २०२५ मध्ये सौदीने २९ दशलक्षांहून अधिक आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे स्वागत केले. सौदीचे पर्यटन मंत्री अहमद बिन अकील अल-खतीब यांनी सांगितले की, पर्यटन क्षेत्राच्या वेगवान विस्ताराच्या पार्श्वभूमीवर 'पॅकेज व्हिसा' हा उपक्रम पर्यटकांचा संपूर्ण प्रवास अधिक सुलभ, जोडलेला आणि अखंड करण्याच्या देशाच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. व्हिसा प्रक्रिया थेट प्रवास बुकिंगशी जोडल्यामुळे पर्यटकांना अधिक सोयीस्कर अनुभव मिळणार असून, पर्यटन क्षेत्रातील विविध भागधारकांमधील समन्वयही अधिक मजबूत होणार आहे.

### हातिव मोहल्ल्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट)ला मोठे बळ

संगमेश्वर (आरंभ पर्व) : हातिव मोहल्ला (ता. संगमेश्वर) येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पक्षप्रवेश व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत युवक रेहान गडकरी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने युवक, महिला आणि ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करत पक्षाला भक्कम पाठबळ दिले. त्याचबरोबर विविध शैक्षणिक व इतर क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात आमदार शेखर निकम यांनी पक्षप्रवेश केलेल्या सर्वांचे स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी राजकारणाचा केंद्रबिंदू हा केवळ निवडणुका नसून जनतेचा सर्वांगीण विकास असल्याचे स्पष्ट केले.

# धाराशिव फाउंडेशनचा तृतीय वर्धापन दिन उत्साहात

## गुणवंत विद्यार्थी व 'धाराशिव भूषण' पुरस्कारार्थींचा गौरव : आ. कैलासद घाडगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य सोहळा संपन्न





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील टिळक स्मारक सभागृह येथे धाराशिव फाउंडेशनचा तृतीय वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. "स्नेहमेळा आनंदाचा", "गुणवंत विद्यार्थी सन्मान" आणि "धाराशिव भूषण सन्मान – २०२६" या कार्यक्रमाला पुणे, पिंपरी-चिंचवड व परिसरातील धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमास धाराशिव फाउंडेशनचे मार्गदर्शक तथा धाराशिव-कळंब मतदारसंघाचे आमदार कैलासदादा घाडगे पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उमरगा-लोहारा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी, प्रा. विठ्ठल कांगणे, माणुसकीची चळवळ संस्थेचे राज देशमुख तसेच शुभांगीताई कैलास घाडगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी कला, चित्रपट, महिला सक्षमीकरण, उद्योग, सामाजिक सेवा, कृषी तंत्रज्ञान, संगीत, संशोधन आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उमेश जगताप, अभिलाषा बेलुरे, रोहित कोकाटे, गोरख भोरे, सागर जाधव, श्रीकृष्ण कळंबकर, खंडेराव मुळे आणि गणेश पावशेरे यांना "धाराशिव भूषण सन्मान – २०२६" प्रदान करून गौरविण्यात आले.

तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रा. विठ्ठल कांगणे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने उपस्थितांना नवी ऊर्जा मिळाली. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात वास्तव्यास असलेल्या धाराशिवकरांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या मातृभूमीशी असलेले नाते अधिक दृढ असल्याचे या सोहळ्यातून अधोरेखित केले.

"आपला जीव... धाराशिव..!" ही भावना जपत धाराशिव फाउंडेशन समाजातील एकोपा, सामाजिक बांधिलकी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी धाराशिव फाउंडेशनचे सर्व समन्वयक, पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि उपस्थित धाराशिवकर बांधवांचे आभार मानण्यात आले.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नये




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा घेतलेला निर्णय तातडीने मागे घेऊन पूर्वीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीनेच परीक्षा घ्यावी, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या निर्णयामुळे राज्यभरातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून त्यांच्या रास्त मागणीला काँग्रेस पक्ष संपूर्ण पाठिंबा देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना गोपाळदादा तिवारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत आपली स्वायत्तता जपावी, अन्यथा काँग्रेसच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही दिला.

## खामगावच्या भुंडेवाडीला बंदिस्त जिम साहित्याचे लोकार्पण



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

खामगाव-भुंडेवाडी ता.जुन्नर येथील युवकांची अनेक दिवसांची बंदिस्त जिमची मागणी आज सोमवारी (ता.१३) प्रत्यक्षात पूर्ण झाली. या कामासाठी डिसेंबर २०२५ पासून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे प्रस्ताव सादर करून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. या प्रयत्नांना यश मिळाल्याने आज भुंडेवाडी येथे अद्ययावत जिम साहित्य उपलब्ध करून देता आले याचा मनस्वी आनंद आणि अभिमान वाटत असल्याचे युवा कार्यकर्ते अजिंक्य घोलप यांनी सांगितले.

यापूर्वीही माजी आमदार अतुल बेनके यांनी भुंडेवाडीतील युवकांना स्वतःच्या जिमचे साहित्य उपलब्ध करून देत त्यांना प्रोत्साहन दिले होते. त्यांच्या सहकार्यामुळे आज या ठिकाणी आधुनिक बंदिस्त जिम उभारण्याचे स्वप्न साकार झाले.

तरुणांच्या आरोग्यदायी आणि सुदृढ भविष्यासाठी ग्रामपंचायत खामगाव नियोजनबद्ध पद्धतीने काम करत आहे. आतापर्यंत खामगाव गावठाण येथे बंदिस्त जिम व खामगाव ओपन जिम

तसेच भुंडेवाडी येथे बंदिस्त जिम अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भविष्यात ज्या-ज्या वाड्यांमधून युवकांकडून मागणी येईल, त्या सर्व ठिकाणी जिम साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

या प्रसंगी माजी सरपंच दशरथ घोलप, ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व अरुण आहेर, शांताराम आहेर पाटील, मार्गदर्शक सोपान आहेर, प्रगतशील शेतकरी राजू आहेर, राजाराम आहेर, माऊली खंडागळे, ग्रामपंचायत खामगावचे उपसरपंच अमोल आहेर, माजी उपसरपंच तथा सदस्य सुरेश काळे,सदस्या प्रतिभा आहेर, छाया खंडागळे, शिक्षिका साबळे , युवा सहकारी सुनिल आहेर, निलेश घोलप, विपुल आहेर, चेतन आहेर, रोहित खंडागळे, जयदीप देवचे, सिद्धेश आहेर, सुयोग आहेर, रवि काळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आदर्श मुख्याध्यापक व आदर्श शिक्षिका पुरस्काराने

## अण्णासाहेब खोत व अनिता व्यवहारे यांचा सन्मान





**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य आणि उत्साहपूर्ण पुरस्कार वितरण सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात आले.

या सोहळ्यात आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार अण्णासाहेब खोत यांना प्रदान करण्यात आला, तर आदर्श शिक्षक पुरस्कार अनिता व्यवहारे यांना देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला.

हा पुरस्कार पुणे विभागाचे शिक्षक आमदार मा. दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते सिंहगड कॉलेज सोलापूर येथे प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. बार्शी तालुक्यातील शेळगाव हायस्कूल येथे अण्णासाहेब खोत यांनी मुख्याध्यापक म्हणून शाळेच्या प्रगतीसाठी घेतलेले उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न आणि विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व मूल्यांची जपणूक यामुळे त्यांना हा पुरस्कार मिळाला. तसेच स्वामी विवेकानंद विद्यालय रुई येथील शिक्षिका अनिता व्यवहारे यांनी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड निर्माण करून त्यांना प्रेरित करण्याचे कार्य केले असून त्यांच्या अध्यापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडून आले आहेत. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पुरस्कार विजेत्यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या योगदानाचे विशेष उल्लेख केले. यावेळी सहकारी धनाजी तिकटे(मुख्याध्यापक), बजरंग गायकवाड (सर) बळीराम गुरव(सर), सुनील खटाळ(सर), धनाजी शिंदे(सर), प्रकाश ठोकळ(सर) तसेच इतर सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पतसंस्थेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांना शेळगाव आर शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष बाबा गायकवाड, सचिव लक्ष्मणराव गायकवाड व संस्थेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी व शिक्षकांनी शुभेच्छा दिल्या.

## 'एआय'ला स्पर्धक नव्हे, तर विचारशक्ती वाढविणारे साधन बनवा : सावंत



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आजचे जग कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) आहे. एआयला स्पर्धक नव्हे, तर विचारशक्ती वाढविणारे साधन म्हणून स्वीकारा. तंत्रज्ञान नोकऱ्या संपवत नाही, तर नव्या प्रकारच्या रोजगारसंधी निर्माण करते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड, क्षमता आणि करिअरच्या नव्या वाटांचा शोध घेत कौशल्याधारित शिक्षण आणि नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा," असे प्रतिपादन महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) चे संस्थापक-संचालक विवेक सावंत यांनी केले. पुणे विद्यार्थी गृहाच्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सवी २५ व्या वर्धापनदिवस सोहळ्यात सावंत बोलत होते. विवेक सावंत म्हणाले, "मानवी बुद्धी ही 'यूज इट ऑर लूज इट' या तत्त्वावर कार्य करते. त्यामुळे साचेबंद विचारांमध्ये अडकून न राहता समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि कौशल्ये विकसित करा. यंत्रांसारखे काम करू नका; एआयचा वापर स्वतःची विचारशक्ती अधिक सक्षम करण्यासाठी करा.

## 'देह विठ्ठल, श्वास विठ्ठल; आत्मा विठ्ठल, परमात्मा विठ्ठल' : डॉ. मधुसूदन घाणेकर

**परिवर्तन स्वाभिमानी पत्रकार संघाचे पहिले जागतिक वारकरी कवी-काव्य संमेलन भक्तिमय वातावरणात उत्साहात**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"जो भक्त विठ्ठलाची निःसीम भक्ती करतो, निष्ठेने आणि श्रद्धेने विठ्ठलाचे स्मरण करतो, त्याला आयुष्यात कधीच काही कमी पडत नाही. विठुरायाच्या भक्तीतून त्याला आपल्या आयुष्याचे सार्थक झाल्याचे समाधान मिळते. पंढरीच्या वारीत सहभागी होणारा प्रत्येक वारकरी विठ्ठलमय होतो. 'देह विठ्ठल, श्वास विठ्ठल; आत्मा विठ्ठल, परमात्मा विठ्ठल' अशी त्याची भक्तिभावातील समरसता होते," असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी तथा पहिल्या विश्व काव्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. मधुसूदन घाणेकर यांनी केले.

परिवर्तन स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित पहिल्या जागतिक वारकरी कवी-काव्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. घाणेकर बोलत होते. वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा, संत साहित्य, भक्ती आणि काव्य यांचा सुंदर संगम या संमेलनाच्या निमित्ताने अनुभवायला मिळाला. संमेलनाला सुमारे १५० वारकरी उपस्थित होते. संमेलनाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन परिवर्तन स्वाभिमानी पत्रकार संघाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा मधुकर्णिका सासवडे यांनी केले. संघाचे संस्थापक-अध्यक्ष संतोष सागवेकर यांनी उपस्थित अतिथींचे स्वागत केले तसेच आभार मानले. श्रद्धा देवळे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. या काव्य संमेलनात वारीमध्ये सहभागी झालेल्या ३६ मान्यवर कवी-कवयित्रींचा डॉ. मधुसूदन घाणेकर आणि संतोष सागवेकर यांच्या हस्ते 'विठ्ठू माऊली पुरस्कार' प्रदान करून गौरव करण्यात आला. वारकरी संप्रदाय आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाचा यानिमित्ताने सन्मान करण्यात आला. जागतिक वारकरी काव्य संमेलनाचे औचित्य साधून डॉ. मधुसूदन घाणेकर संपादित 'डहाळी' या विश्वविक्रमी अनियतकालिकाच्या ११४४ व्या विशेष अंकाचे प्रकाशनही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संमेलनात सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी विविध कविता, भक्तिगीते आणि भजने सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# दरोड्यांचा तयारीत असलेल्या आंतरराज्यीय टोळी जेरबंद

## सहा आरोपींना अटक : १४ लाख ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त




**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

ओतूर ता.जुन्नर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या आंतरराज्यीय दरोडेखोरांच्या टोळीतील सहा आरोपींना पुणे ग्रामीण पोलिसांनी धाडसी कारवाईत अटक केली.

आरोपींकडून एक गावठी पिस्तूल, जिवंत काडतुसे, धारदार हत्यारे आणि चोरीची बोलेरो जीप असा १४ लाख ८७ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यांतील दरोडा, दरोड्याचा प्रयत्न, जबरी चोरी, घरफोडी व वाहन चोरीचे एकूण २० गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत.

कोळवाडी (ता. जुन्नर) येथे १२ जुलै रोजी सकाळी लोणी प्रवरा (जि. अहिल्यानगर) येथून चोरीस गेलेली बोलेरो (एमएच-१७-एजे-३०७५) संशयास्पदरीत्या आढळून आली. वाहनाचा शोध घेत असलेले मालकाचे नातेवाईक विघ्नेश सुभाष घोलप यांनी वाहनातील संशयितांना विचारणा केली असता त्यांच्यात वाद झाला. यावेळी त्यांनी "चोर-चोर" असा आरडाओरडा करताच ग्रामस्थ घटनास्थळी धावले. ग्रामस्थांनी दोन आरोपींना पकडले, तर इतर चार आरोपी डोंगराच्या दिशेने पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा आणि जुन्नर उपविभागातील पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. दोन स्वतंत्र पथके तयार करून आलमे, बल्लाळवाडी, कोळवाडी व डिंगोरे परिसरातील डोंगर-दऱ्यांमध्ये सुमारे सहा तास शोध घेण्यात आला. स्थानिक नागरिक आणि पोलीस पाटील यांच्या मोलाच्या सहकार्याने पळून गेलेल्या चारही आरोपींना अखेर ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सोनूसिंग कापूरसिंग टाक (हडपसर, पुणे), जिलूसिंग शेरसिंग दुधानी (खोपोली, रायगड), करणसिंग गगनसिंग टाक (परभणी), पंकजसिंग काळुसिंग शिकलगार उर्फ दुधानी (अंबरनाथ), पापीसिंग उर्फ कृष्णसिंग साहेबसिंग टाक (परभणी) आणि मंगलसिंग मायासिंग दुधानी (परभणी) यांचा समावेश आहे. या प्रकरणी ओतूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम ३१०(४), ३१०(५), आर्म्स ॲक्ट तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक शुभमकुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, जुन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रेय गुंड, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव यांच्यासह पोलीस अंमलदार आनंदा भवारी, बाळशिराम भवारी, धनंजय पालवे, सुरेश गेंगजे, दिनेश साबळे, नामदेव कांबळे, नरेंद्र गोराने, देविदास खेडकर, दीपक साबळे, राजू मोमीन, संदीप वारे, अक्षय नवले, महिला पोलीस हवालदार संगीता मधे, रेश्मा फापाळे, पोलीस शिपाई मनोज राठोड, रोहित बोंबले, ज्योतीराम पवार, सुभाष केदारी, विशाल गोडसे, योगेश उकिडे, महिला पोलीस शिपाई काळे तसेच जुन्नर आरसीपी पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

### २० गंभीर गुन्ह्यांची उकल

आरोपींकडे केलेल्या सखोल चौकशीत महाराष्ट्र व तेलंगणा राज्यांतील २ दरोडे, १ दरोड्याचा प्रयत्न, २ जबरी चोरी, १३ घरफोड्या आणि २ वाहन चोरी असे एकूण २० गंभीर गुन्हे उघडकीस आले. तसेच या आरोपींवर यापूर्वी महाराष्ट्र, तेलंगणा आणि इतर राज्यांमध्ये ५० हून अधिक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.